भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय २०११-१२/६०

डीबीओडी क्र. डीआयआर.(इ एक्स पी.)बीसी०४/०४.०२.००२/२०११-१२ जुलै १, २०११,
आषाढ शके १०, १९३३

**सर्व व्यावसायिक बँका**
**(आरआरबीज वगळून)**

माननीय महोदय/महोदया,

**निर्यातदारांना रुपया/विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट आणि ग्राहक सेवेवरील महापरिपत्रक**

जसे आपण जाणता कि, विषयावरील सर्व सूचना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात म्हणून, भारतीय रिझर्व बँकेने महापरिपत्रक डीबीओडी.डीआयआर(इएक्सपी.)क्र. ०६/०४.०२.०२/२०१०-११ दिनांक जुलै १, २०१०, जी आता ३० जून २०११ रोजी अद्ययावत करण्यात आली आहेत. याची नोंद घ्यावी कि, बँकानी ऋणकोना निर्यात क्रेडिट देण्याचा संबध आहे त्याबाबतीत, परिशिष्टात सूचीबद्ध केलेल्या सर्व परिपत्रकात समाविष्ट असलेल्या सूचना हे महापरिपत्रक एकत्रित आणि अद्ययावत करते. हे महापरिपत्रक आरबीआयने बँकाना/निर्यातदारांना/निर्यात संघटनाना वर्षभराच्या काळात निर्गमित केलेल्या सूचनाहि अंगीकृत करते. महापरिपत्रक आरबीआयची वेबसाइट (http://www.rb.org.in) वर ठेवण्यात आले आहे. सुधारित महापरिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

आपला विश्वासू,
**(पी. आर. रवि मोहन)**
**मुख्य महाव्यवस्थापक**

बँकिंग ऑपरेशन्स आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, १३ वा मजला, एनसीओबी, शहिद भगत सिंग मार्ग, मुंबई - ४००००१ दुरध्वनी ९१-२२-२२६०१००० फॅक्सः ९१-२२-२२७०१२४१ ईमेल : cgmicdbodco@rbi.org.in

**निर्यातदारांना रुपया/विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट आणि ग्राहक सेवेवरील महापरिपत्रक**

**अनुक्रमणिका**


| अनु क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| अ. | उद्देश | ३ |
| ब. | वर्गीकरण | ३ |
| क. | एकत्रित करण्यात आलेले आधीचे निर्देश | ३ |
| ड. | अंमलबजावणीची व्याप्ती | ३ |
| | रुपरेशा | ४ |
| | प्रस्तावना | ५ |
| | भाग –१ रुपया निर्यात क्रेडिट | ६ |
| १. | नौप्रेषपूर्व निर्यात क्रेडिट | ६ |
| २. | नौप्रेषपश्चात निर्यात क्रेडिट | १३ |
| ३. | मानीव निर्यात- सवलतीचे रुपया निर्यात क्रेडिट | १७ |
| ४ | निर्यात क्रेडिट वरील व्याज | १७ |
| | भाग -बी विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट | २२ |
| ५. | विदेशी चलनातील नौप्रेषपूर्व क्रेडिट | २२ |
| ६. | विदेशी चलनातील नौप्रेषपश्चात क्रेडिट | २७ |
| ७. | निर्यात क्रेडिटवरील व्याज | ३० |
| | भाग- सी निर्यात क्रेडिट – ग्राहक सेवा, पोचवणीच्या कार्यपद्धीतीचे सुलभीकरण आणि अहवाल देण्याच्या आवश्यकता | ३२ |
| ८. | ग्राहक सेवा आणि कार्यपद्धतीचे सुलभीकरण | ३२ |
| ९. | अहवाल देण्याच्या आवश्यकता | ३७ |
| १०. | हिऱ्याच्या निर्यातदाराना/कॉन्फ्लिक्ट हिऱ्याना नौप्रेषपूर्व क्रेडिट | ३८ |
| ११. | परिशिष्ट १- निर्यात क्रेडिटच्या पुनरावलोकनासाठी कार्यकारी गटाच्या शिफारशी | ३९ |
| १२. | परिशिष्ट २-निर्यात क्रेडिट डेटा(वाटप / थकित) | ४१ |
| १३. | परिशिष्ट ३-हिरे ग्राहकांकडून वचनपत्र | ४२ |
| १४. | जोडपत्र १- रुपया निर्यात क्रेडिट-परिपत्रके | ४३ |
| १५. | जोडपत्र २- विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट-परिपत्रके | ५५ |
| १६. | जोडपत्र ३- निर्यात क्रेडिट-ग्राहक सेवा- परिपत्रके | ५७ |

**निर्यातदारांना रुपया/विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट आणि ग्राहक सेवेवरील महापरिपत्रक**

**अ. उद्देश**

निर्यात पत आणि ग्राहक सेवा ह्या संदर्भात भारतीय रिजर्व बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या चौकटीनुसार नियम/ नियामक तरतुदी आणि स्पष्टीकरण अधिक मजबूत करणे.

**ब. वर्गीकरण**

बँक नियमन अधिनियम, १९४९ च्या कलम २१ आणि ३५ ए अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी रिजर्व बँकेद्वारे जारी करण्यात आलेले बंधानकारक निर्देश

**क. एकत्रित करण्यात आलेले आधीचे निर्देश**

ह्या महापरिपत्रकामध्ये वर्षभरात जारी करण्यात आलेल्या परिशिष्टे आणि स्पष्टीकरणे ह्यामध्ये देण्यात आलेल्या परिपत्रकांमधील सूचना आणि सर्व अद्ययावत निर्देशांना एकत्रित करण्यात आले आहे.

**ड. अंमलबजावणीची व्याप्ती**

प्रादेशिक ग्रामीण बँका वगळता सर्व अनुसूचित वाणिज्यिय बँकांना लागू आहे.

**रुपरेशा**

**भाग —ए**
**रुपया निर्यात क्रेडिट**

१. नौप्रेषपूर्व निर्यात क्रेडिट
२. नौप्रेषपश्चात निर्यात क्रेडिट
३. मानीव निर्यात- सवलतीचे रुपया निर्यात क्रेडिट
४ निर्यातक्रेडिटवरील व्याज

**भाग -बी**
**विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट**

५. विदेशी चलनातील नौप्रेषपूर्व क्रेडिट
६. विदेशी चलनातील नौप्रेषपश्चात क्रेडिट
७. निर्यात क्रेडिटवरील व्याज

**भाग- सी**
**नर्यात क्रेडिट — ग्राहक सेवा, पोचवणीच्या कार्यपद्धीतीचे सुलभीकरण आणि अहवाल देण्याच्या आवश्यकता**

८. ग्राहक सेवा आणि कार्यपद्धतीचे सुलभीकरण
९. अहवाल देण्याच्या आवश्यकता
१०. हिऱ्याच्या निर्यातदाराना/कॉन्फ्लिक्ट हिऱ्याना नौप्रेषपूर्व क्रेडिट
११. परिशिष्ट १- निर्यात क्रेडिटच्या पुनरावलोकनासाठी कार्यकारी गटाच्या शिफारशी
१२. परिशिष्ट २-निर्यात क्रेडिट डेटा(वाटप / थकित)
१३. परिशिष्ट ३-हिरे ग्राहकांकडून वचनपत्र
१४. जोडपत्र १- रुपया निर्यात क्रेडिट-परिपत्रके
१५. जोडपत्र २- विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट-परिपत्रके
१६. जोडपत्र ३- निर्यात क्रेडिट-ग्राहक सेवा- परिपत्रके

**प्रस्तावना**

## निर्यात पत योजना

आरबीआयने निर्यात वित्तासेवेची संकल्पना सर्वप्रथम १९६७ मध्ये आणली. आंतरराष्ट्रीय दृष्टीने तुल्यबळ असलेल्या व्याज दरानुसार निर्यातदारांना अल्प मुदतीचे कार्यकारी आर्थिक भांडवल उपलध करून देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली.

३० जून २०१० पर्यंत आधीची योजना अमलात असताना, आरबीआयने फक्त निर्यात क्रेडिटसाठी व्याज दरावरील मर्यादा निश्चित केली होती आणि बीपीएलआर, प्रचलित मार्गदर्शक सूचना आणि कर्जदारांच्या खात्यातील आजवरच्या नोंदी आणि जोखीम आकलन  लक्षात घेऊन ह्या मर्यादेतील दरांपर्यंत व्याज दर निश्चित करण्याची मोकळीक बँकांना होती. बँकांच्या कर्जाच्या उत्पादनांच्या किमतींच्या संदर्भात पारदर्शकता वाढवण्यासाठी बँकांना (i) निधींची वास्तविक किंमत, (ii) चालू ठेवण्याचे खर्च आणि (iii)भांडवल खर्च आणि नफ्यासाठी आवश्यक नियामक तरतुदी करण्यासाठी कमीत कमी मार्जिन  विचारात घेऊन त्यांचे मार्गदर्शक प्राथमिक कर्ज दर (बेंचमार्क प्राईम लेंडिंग रेट- बीपीएलआर) निर्वरित करण्याचा सल्ला देण्यात आला होता. तरीही, २००३ मध्ये सुरू करण्यात आलेली बीपीएलआर प्रणाली कर्ज देण्यामध्ये पारदर्शकता आणणे, ह्या तिच्या मूळ उद्दिष्टाला साध्य करण्यात कमी पडली. बीपीएलआर प्रणालीमध्ये बँका बीपीएलआरच्या कमी कर्ज देऊ शकत होत्या, हे ह्याचे मुख्य कारण होते. ह्याच कारणामुळे, रिजर्व बँकेच्या पॉलिसी दरांचे रुपांतर बँकांच्या कर्ज दरांमध्ये होण्याच्या प्रक्रियेचे मूल्यमापन करणे कठिण होते.
त्यानुसार, मार्गदर्शक प्राथमिक कर्ज दरावरीक कार्यगटाच्या शिफारसींनुसार (अध्यक्ष- श्री दीपक मोहंती) बँकांना १ जुलै २०१० पासून पाया दराच्या प्रणालीचा अंगीकार करण्यास सूचवण्यात आले. पाया दर प्रणालीचा उद्देश बँकांच्या कर्ज दरामध्ये पारदर्शकता आणणे आणि आर्थिक वेरणाच्या हस्तांतरणाचे अधिक योग्य मूल्यमापन करणे, हे आहे. पाया दर प्रणाली लागू झाल्यानंतर १ जुलै २०१० पासून रुपयाची निर्यात कर्ज घेणा-या सर्व टेनर्सना लागू असलेले व्याज दर पाया दराइतके किंवा त्याहून अधिक आहेत.

**भाग -१**

**रुपया निर्यात क्रेडिट**

१. **नौप्रेषपूर्व निर्यात क्रेडिट**

१.१ रुपया नौप्रेषपूर्व क्रेडिट / पॅकिंग क्रेडिट

१.१.१ व्याख्या

"नौप्रेषपूर्व क्रेडिट-पॅकिंग क्रेडिट" म्हणजे समुद्रपार विक्रेत्याने निर्यातदाराच्या नावे किंवा एखाद्या अन्य व्यक्तीच्या नावे उगडलेल्या पतपत्राच्या किंवा भारतातून मालाच्या/सेवेच्या निर्यातीच्या निश्चित किंवा रद्द न करता येणाऱ्या ऑर्डरच्या किंवा भारतातून निर्यातीसाठी निर्यातदाराला किंवा अन्य व्यक्तीला ऑर्डर कोणत्याहि अन्य पुराव्याच्या आधारावर, बँकानी निर्यातदाराना मालाच्या खरेदीसाठी, प्रक्रियेसाठी, निर्मितीसाठी किंवा नौप्रेषाच्या आधीपूर्व पॅकिंगला वित्तपुरवठा करण्यासाठी/सेवा पुरविण्यासाठी खेळत्या भांडवलाच्या खर्चापोटी, बँकेकडे जमा केलेली निर्यातीची ऑर्डर किंवा पतपत्र सोडून दिले असल्याखेरीज, मंजूर केलेले कोणतेहि कर्ज किंवा अग्रिम किंवा कोणतेहि अन्य क्रेडिट.

१.१.२ अग्रिमाचा कालावधी

**(१) बँकांद्वारे पॅकिंग क्रेडिटसाठी देण्यात येणारा कालावधी प्रत्येक प्रकरणातील, प्रापण, निर्मिती किंवा प्रक्रिया(जेथे आवश्यक असेल) आणि संबंधित मालाचे नौप्रेषण/सेवा पुरवठा यासाठी लागणाऱ्या वेळेसारख्या परिस्थितीवर अवलंबून असेल. पॅकिंग क्रेडिट किती कालावधीसाठी द्यायचे हे, विविध संबधित घटकांचा विचार करून प्राथमिकपणे बँकेने ठरवायचे आहे जेणेकरून निर्यातदाराला मालाचे नौप्रेषण करणे किंवा सेवा पुरविण्यासाठी पुरेसा वेळ मिळणे शक्य होईल.**

**(२) जर, नौप्रेषपूर्व अग्रिमे अग्रिमांच्या तारखेपासून ३६० दिवसांच्या आत निर्यात कागदपत्रे सादर करून समायोजित केली नाहीत तर, अग्रिमे निर्यातदाराला सवलतीच्या दरासाठी अर्हतापात्र होण्यास आरंभापासून अपात्र ठरतील.**

**(३) आरबीआय (एम पी डी) कडून जारी करण्यांत आलेल्या सूचनां प्रमाणे आरबीआय केवळ १८० दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या कालावधीसाठी पुनर्वित्तपुरवठा करील.**

१.१.३ पॅकिंग क्रेडिटचे वाटप

(१) सामान्यपणे, मंजूर केलेले प्रत्येक पॅकिंग क्रेडिट मंजुरीच्या कालावधीच्या आणि निधीच्या अंतिम उपयोजाच्या संनियंत्रणाच्या हेतूने स्वतंत्र खाते म्हणून ठेवावे.

(२) बँका कार्यवाहीच्या आदेशांच्या/एलसीच्या गरजेप्रमाणे पॅकिंग क्रेडिट एकरकमी किंवा टप्प्याटप्प्याने मुक्त करू शकतात.

(३) बँका प्रक्रिया, निर्मिती वगैरे विविध टप्प्यांवर निर्यात करायच्या मालाच्या/सेवेच्या प्रकारानुसार म्हणजे तारणगहाण, गहाण वगैरे वेगवेळ्या टप्प्यावर वेगळी खाती ठेवू शकतात आणि खात्यातील थकित रक्कम आका खात्यातून दुसऱ्या खात्यात हस्तांतरणाद्वारे आणि शेवटी संबंधित खरेदीची निर्यात कागदपत्रे, जिस्काउंट वगैरे द्वारा समायोजित केली जाईल याची खात्री करता येईल.

(४) बँकानी निधीच्याय अंतिम वापरावर बारीक लक्ष ठेवणे चालूच ठेवावे आणि कमी व्याज दराचे क्रेडिट निर्यातीच्या प्रामाणिक गरजांसाठीच वापरले जात आहे याची खात्री करावी. बँकानी निर्यातदाराने निर्यात ऑर्डर्स वेळेवर पूर्ण करण्यात केलेल्या प्रगतीचेहि संनियंत्रण करावे.

१.१.४ पॅकिंग क्रेडिटचे परिसमापन

(१) सर्वसाधारण

एखाद्या निर्यातदाराला मंजूर केलेले पॅकिंग क्रेडिट/नौप्रेषपूर्व क्रेडिटचे, निर्यात वस्तूच्या खरेदीसाठी काढलेल्या बिलांच्या उत्पन्नातून, डिस्काउंट वगैरेतून परिसमापन करता येईल, आणि त्याद्वारे नौप्रेषपूर्व क्रेडिटचे नौप्रेषपश्चात क्रेडिटमध्ये रुपांतर करता येईल. त्याशिवाय, निर्यातदार आणि बँकर यांच्यातील

परस्पर संमतीच्या कराराच्या आधीन, त्याचे एक्स्चेंज अर्नर्स करंसी खात्यातून(इइएफसी खाते) त्याचप्रमाणे प्रत्यक्षात झालेल्या निर्यातीच्या मर्यादेपर्यंत निर्यातदाराच्या रुपया स्रोतातून परतफेड/पूर्वपरतफेड करता येईल. अशा प्रकारे परिसमापन/परतफेड झाली नाही तर बँका परिच्छेद ४.२.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अग्रिमाच्या तारखेपासून व्याज दर ठरविण्यास मुक्त आहेत.

(२) निर्यातीच्या मूल्यापेक्षा अधिकांश पॅकिंग क्रेडिट

(ए) <u>जेथे उपउत्पादने निर्यात करता येतील</u>

जेथे निर्यातदार कच्चे काजूगर वगैरेसारख्या शेती उत्पादनाच्या प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या खाती तोट्याच्या कारणामुळे पॅकिंग क्रेडिटच्या परिसमापनासाठी सममूल्य निर्यात बिले सादर करू शकणार नाही, बँका, इतर बाबींबरोबरच, निर्यातदाराना अधिकांश पॅकिंग क्रेडिट काजू टरफलाचे तेल वगैरेसारख्या उपउत्पादनांच्या बाबतीत काढलेल्या निर्यातबिलांच्या द्वारे निर्वापण करण्ास परवानगी देतील.

(बी) <u>जेथे अंशिक स्थानिक विक्री समाविष्ट आहे</u>

तथापि, तंबाखू, मिरी, वेलची, काजूगर वगैरे शेतीआधारित उत्पादनांच्या बाबतीत, निर्यातदाराने कच्च्या शेती मालाची काहीशी अधिक प्रमाणातील राशी खरेदी करणे आणि तिचे निर्यातयोग्य आणि अ-निर्यातयोग्य प्रकारात मालात गुणवर्धन करणे आणि केवळ आधीची निर्यात करणे आवश्यक आहे. शिल्लक राहिलेली अ-निर्यातयोग्य माल स्थानिक स्तरावर विकणे आवश्यक आहे. अशा अ-निर्यातयोग्य हिश्शाला सामावून घेण्याऱ्या पॅकिंग क्रेडिटसाठी, बँकानी पॅकिंग क्रेडिटच्या अग्रिमांच्या तारखेपासून स्थानिक अग्रिमाना लागू असलेला व्यावसायिक व्याज दर आकारणे आवश्यक आहे आण पॅकिंग क्रेडिटचा हा हिस्सा आरबीआयकडून कोणत्याहि पुनर्वित्तपुरवठ्याला पात्र असणार नाही.

(सी) <u>डिऑइलड/डिफॅटेड केकसची निर्यात</u>

बँकाना एचपीएस शेंगदाणा आणि डिऑइलड/डिफॅटेड केक्सच्या निर्यातदारांना आवश्यक कच्च्या मालाच्या मर्यादेपर्यंत पॅकिंग क्रेडिटचे अग्रिम मंजूर करण्याची, त्याचे मूल्य निर्यात ऑर्डरच्या मूल्यापेक्षा अधिक असले तरीहि परवानगी आहे. निर्यात ऑर्डरपेक्षा अधिक असलेले अग्रिम, सवलतीच्या व्याज दराला पात्र होण्यासाठी अग्रिमाच्या तारखेपासून ३० दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या कालावधीत, त्याची एकतर रोख किंवा शिल्लक राहणाऱ्या उपउत्पादन तेलाच्या विक्रीतून समायोजित करणे आवश्यक आहे.

(३) तथापि, बँकाना ज्यांचा **पूर्वेतिहास चांगला** आहे अशा त्यांच्या निर्यातदार ग्राहकाना **खालील सवलती** देण्याची प्रचालनीय लवचिकता आहेः

(ए) निर्यात कागदपत्रांच्या उत्पन्नाने पॅकिंग क्रेडिटची परतफेड/परिसमापन चालू राहील, **पण, ती निर्यातदाराने निर्यात केलेल्या त्याच किंवा अन्य कोणत्याहि वस्तूचा समावेश असणाऱ्या कोणत्ाहि अन्य ऑर्डरशी संबंधित निर्यात कागदपत्रांनी असू शकेल.** अशा प्रकारे कराराचा बदल अनुज्ञेय करताना, बँकानी खात्री करावी कि ते व्यावसायिकदृष्ट्या आवश्यक आणि अटळ आहे. बँकानी विशिष्ट वस्तूच्या नौप्रेषासाठी दिलेले पॅकिंग क्रेडिट सामान्य पद्धतीने परिसमापित का केले जाऊ शकत नाही याबाबत समाधान करून घ्यावे. शक्यतोवर, कराराचा बदल जर निर्यातदाराने त्याच बँकेत खाते चालू ठेवले किंवा त्याला व्यापारी संघाच्या, एखादा असेल तर, सदस्यांची मंजुरी असेल तरच अनुज्ञेय करावा.

(बी) विद्यमान पॅकिंग क्रेडिट, निर्यातदाराने ज्या निर्यात कागदपत्रांच्या समक्ष कोणतेहि पॅकिंग क्रेडिट घेतलेले नाही, त्याने काढून टाकता येईल. तथापि, हे शक्य आहे कि निर्यातदार एका बँकेकडून इइपीसी प्रापप्त करणार नाही आणि कागदपत्रे दुसऱ्या बँकेला सादर करील. ही शक्यता लक्षात घेऊन, सादर केलेल्या कागदपत्रांसमक्ष निर्यातदाराने अन्य बँकेकडून पॅकिंग क्रेडिट प्राप्त केलेले नाही याची खात्री करून घेतल्यानंतर, बँकानी अशी सुविधा द्यावी. कोणतेहि पॅकिंग क्रेडिट अन्य बँकेकडून प्राप्त केले असल्यास, ज्या

दुसऱ्या बँकेला कागदपत्रे सादर केली आहेत तिने खात्री करून घेतली पाहिजे कि त्या पॅकिंग क्रेडिटचा उपयोग पहिल्या बँकेचे पॅकिंग क्रेडिट परिसमापित करण्यासाठी केला जात आहे.

(सी) या सवलती, भगिनी/सहयोगी/समूह कंसर्नसना **देऊ नयेत**.

१.१.५ <u>"रनिंग अकाउंट" सुविधा</u>

(१) पूर्वी म्हटल्याप्रमाणे, साधारणपणे निश्चित निर्यात ऑर्डर ची पतपत्रे जमा केल्यावर निर्यातदारांना नौप्रेषपूर्व क्रेडिट पुरविले जाते. काही अन्य प्रकरणांत, निर्मिती आणि मालाच्या नौप्रेषणासाठी लागलेला वेळ निर्यातीच्या कंत्राटाच्या करारापेक्षा अधिक असतो. अनेक बाबतीत, निर्यतादाराना समुद्रपार खरेदीदारांच्या पतपत्रांच्या-निश्चित निर्यात ऑर्डरच्या अपेक्षेत कच्च्या मालाचे प्रापण करावे लागते, निर्यात उत्पादनाची निर्मिती करावी लागते आणि तो नौप्रेषणासाठी तयार ठेवावा लागतो. अशा प्रकरणात निर्यातदाराना पर्याप्त नौप्रेषपूर्व क्रेडिट प्राप्त करण्यात येणाऱ्या अडचणी विचाराच घेऊन, बँकाना अशी सुविधा देण्याच्या बाबतीतील बँकांच्या अनुमानावर अवलंबून आणि खालील अटींच्या आधीन, पतपत्रे /निश्चीत निर्यात ऑर्डरचा आग्रह न धरता, कोणत्याहि वस्तूच्या संबधात नौप्रेषपूर्व क्रेडिट "रनिंग अकाउंट" सुविधा देण्यासाठी अधिकार देण्यात आला आहे.

(ए) बँका केवळ त्याच निर्यातदाराना "रनिंग अकाउंट" सुविधा देऊ शकतील ज्यांचा पूर्वेतिहास चांगला आहे आणि इएक्सपीोर्ट ओरिएन्टेड युनीटस(इओयूज) /मुक्त व्यापार विभागातील युनीटस /इएक्सपीोर्ट प्रोसेसिंग झोनस(इपीझेडस) आणि विशेष आर्थिक क्षेत्रे(एसइजेडस) यानासुद्धा.

(बी) जेथे नौप्रेषपूर्व क्रेडिट "रनिंग अकाउंट" सुविधा दोण्यात आली आहे अशा सर्व प्रकरणात, बँकानी ठरविलेल्या किमान वास्तव कालावधीत पतपत्रे /निश्चीत निर्यात ऑर्डर हजर केल्या पाहिजेत.

(सी) बँकानी स्वतंत्र निर्यात बिले, जेव्हा केव्हा सर्वात आधीच्या नौप्रेष क्रेडिटच्या समक्ष वाटाघाटी /गोळा करण्यासाठी प्राप्त होतील तेव्हा "पहिला आत पहिला बाहेर"(एफआयएफओ) तत्त्वावर मार्क ऑफ करावीत. अधिक नमूद करण्याची गरज नाही कि, उक्त दर्शविल्याप्रमाणे, नौप्रेषपूर्व क्रेडिट मार्क ऑफ करताना, बँकानी खात्री करावी कि, व्यक्तिगत नौप्रेष क्रेडिटसाठी उपलब्ध असलेले सवलतीचे क्रेडिट मंजुरी कालावधी किंवा अग्रिमाच्या तारखेपासून ३६० दिवस, यापैकी जे आधी असेल त्याच्या बाहेर जाणार नाही.
(डी) निर्यातदाराने ज्या निर्यात कागदपत्रांसमक्ष कोणतेहि पॅकिंग क्रेडिट घेतलेले नाही त्याच्या उत्पन्नातूनहि पॅकिंग क्रेडिट मार्क ऑफ करता येईल.
(२) जर असे निदर्शनास आले कि निर्यातदार सुविधेचा दुरुपयोग करीत आहे तर, सुविधा ताबडतोब काढून घेण्यात यावी.
(३) ज्या बाबतीत निर्यातदाराने अटी आणि शर्तींची पूर्तता केली नसेल, अग्रिमावर आरंभापासून व्यावसायिक कर्जाचा दर लागू होईल. अशा बाबतीत, संबंधित नौप्रेषपूर्व क्रेडिटच्या बाबतीत बँकानी आरबीायकडून प्राप्त केलेल्या पुनर्वित्तपुरवठ्याच्या हिश्शावर बँकांना उच्च दराने व्याज द्यावे लागेल. अशी सर्व प्रकरणे आर्थिक धोरण विभाग, भारतीय रिझर्व बँक, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई ४०० ००१ यांना कळवावीत जे पुनर्वित्तपुरवठ्याच्या रकमेवर आकारायच्या व्याजाबाबत निर्णय घेतील.

**(४) रनिंग अकाऊंट सुविधा उपपुरवठादारांना मंजूर करू नये.**

१.१.६ <u>पॅकिंग क्रेडिटवर व्याज</u>

त्यासंबंधातील व्याज दराची रचना आणि सूचना परिच्छेद ४ मध्ये तपशीलवार दिल्या आहेत.

१.१.७ <u>निर्यातीसाठी अगाऊ प्रदानाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या धनादेश, धनाकर्ष वगैरेंच्या उत्पादनासमक्ष निर्यात क्रेडिट</u>

(१) जेथे निर्यातदाराला निर्यातीच्या प्रदानापोटी धनादेश, धनाकर्ष वगैरेंच्या द्वारे विदेशातून थेट वित्तप्रेषणे प्राप्त होतात, बँका विदेशातून प्राप्त झालेल्या धनादेशाच्या, धनाकर्षाच्या वगैरे वसुलीपर्यंत चागंला पूर्वेतिहास

असणाऱ्या निर्यातदाराना, ते निर्यात ऑर्डरच्या समक्ष आहे, संबंधित मालाच्या बाबतीतील चांगल्या व्यापारी पद्धतीनुसार आहे आणि निर्यातीच्या उत्पन्नाच्या वसुलीची पद्धत अस्तित्वातील नियमानुसार आहे याबाबत स्वतःचे समाधान करून घेऊन, सवलतीच्या दराने निर्यात क्रेडिट मंजूर करू शकतात.

(२) उक्त अटींची पूर्तता प्रलंबित असताना जर, एखाद्या निर्यातदाराची सामान्य व्यवसायिक दराने सोय करण्यात आली असेल तर, बँकांनी एकदा पूर्वोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर, पूर्वलक्षी प्रभावाने सवलतीचा दर प्रभावी करावा आणि निर्यातदाराला फरक परत द्यावा.

१.२ विशिष्ट क्षेत्रे /विभागांना रुपया नौप्रेषपूर्व क्रेडिट

१.२.१ एसटीसी /एमएमटीसी /अन्य निर्यात गृहे, एजन्सीज वगैरे द्वारे मार्गस्थ केलेल्या निर्यातीसाठी निर्माता पुरवठादाराला रुपया निर्यात पॅकिंग क्रेडिट

(१) ज्या निर्माता पुरवठादारांकडे त्यांच्या स्वतःच्या नावे निर्यात ऑर्डर नाही, आणि जे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन / मिनरल्स अँड मेटल्स ट्रेडिंग कॉर्पोरेशन किंवा अन्य निर्यात गृहे, एजन्सीज मार्फत मालाची निर्यात करतात, त्याना बँका निर्यात पॅकिंग क्रेडिट मंजूर करू शकतात.

(२) अशी अग्रिमे, नेहमीच्या नियमांव्यतिरिक्त, खालील अटींची पूर्तता केल्यास, पुनर्वित्तपुरवठ्याला पात्र असतीलः

(ए) बँकानी निर्यात गृहाकडून निर्यात ऑर्डरचा तपशील आणि त्याखाली निर्यातदाराने कार्यवाही करायचा भाग दाखविणारे आणि निर्यात गृहाने ऑर्डरच्या अशा पुरवठादाराने कार्यवाही करायच्या भागासाठी कोणतेहि पॅकिंग क्रेडिट प्राप्त केलेले नाही किंवा प्राप्त करणार नाही असेहि प्रमाणित करणारे पत्र प्राप्त करावे.

(बी) आपापसात संमंत्रणा करून आणि दोही पक्षांच्या निर्यात गरजा विचारात घेऊन, दोघांमध्ये म्हणजेच निर्यात गृह आणि पुरवठादार, ज्या पॅकिंग क्रेडिटसाठी सवलतीचा व्याजाचा दर आकारण्यात येणार असेल त्याच्या कालावधीची विभागणी करून द्यावी. नौप्रेषपूर्व क्रेडिटवरील सवलतीचा व्याज दर निर्यात गृहन/एजन्सी आणि पुरवठादाराच्या बाबतीत ठरवून दिलेला कालावधीपर्यंत एकत्रितपणे उपलब्ध असेल.

(सी) निर्यातगृहानी निर्यात पतपत्रे किंवा ऑर्डर्सचा संबंधित तपशील देऊन पुरवठादाराच्या नावे आंतरदेशीय पतपत्रे उघडावीत आणि अशा आंतरदेशीय पतपत्रांच्या अधीन बिलांच्या वाटाघाटीद्वारे पॅकिंग क्रेडिट खात्यातील थकित रक्कम काढून टाकावी. अशी आंतरदेशीय पतपत्रे पुरवठादाराच्या नावे उघडणे जर निर्यात गृहांसाठी गैरसोयीचे असेल तर, पुरवठादारानी निर्यातीसाठी पुरविलेल्या मालाची बिले निर्यात गृहांवर काढावीत आणि अशा बिलांच्या उत्पन्नातून पॅकिंग क्रेडिट अग्रिमे समायोजित करावीत. अशा व्यवस्थेखाली काडलेल्या बिलांच्या बरोबर लेडिंगची बिले किंवा अन्य निर्यात कागदपत्रे जोडलेली नसतील तर, बँकेने प्रत्येक तिमाहीच्या अखेरीला पुरवठादारामार्फत निर्यत गृहांकडून असे प्रमाणपत्र प्राप्त करावे कि या व्यवस्थेखाली पुरवला गेलेला माल प्रत्यक्षात निर्यात केला गेला आहे. प्रमाणपत्रात संबंधित बिलाचा तारीख, रक्कम आणि ज्या बँकेमार्फत बिलाच्या वाटाघाटी करण्यात आल्या असतील तिचे नावे असा तपशील देण्यात आलेला असावा.

(डी) बँकेने पुरवठादाराकडून वचनपत्र घ्यावे कि निर्यातीच्या ऑर्डरसमक्ष काही अग्रिम प्रदान प्राप्त झाले असल्यास ते पॅकिंग क्रेडिट खात्यात जमा केले जाईल.

१.२.२ उपपुरवठादाराना रुपया निर्यात पॅकिंग क्रेडिट

पॅकिंग क्रेडिट इओएच आणि निर्माता पुरवठादार यांच्या बाबतीत असल्याप्रमाणे निर्यात ऑर्डर धारक(इओएच) आणि कच्चा माल, घटक वगैरेंच्या पुरवठादार यांच्यात खालील अटींच्या अधीन विभागून घेता येईल.

(ए) योजनेखाली रनिंग खात्याची सुविधा विचाराधीन नाही. योजनेत निर्यातगृह/व्यापारी गृहे/स्टार व्यापारी गृहे वगैरे किंवा केवळ निर्माता निर्यातदारांच्या नावे प्राप्त झालेल्या पतपत्रांचा किंवा निर्यात ऑर्डरचा समावेश असेल. योजना चांगला पूर्वेतिहास असलेल्या निर्यातदारानाच उपलब्ध करून देण्यात यावी.

(बी) इओएचच्या बँकरने उपपुरवठादाराने निर्यात व्यवहाराचा एक भाग म्हणून प्राप्त झालेल्या निर्यात ऑर्डर किंवा पतपत्रासमक्ष उपपुरवठादाराने इओएचला पुरविलेला माल विनर्दिष्टीत करून आंतरदेशीय पतपत्र उघडावे. अशा पतपत्रांच्या आधारावर, उपपुरवठादाराची बँक, निर्यात करायच्या मालासाठी आवश्यक असलेल्या घटकांची निक्मिती करणे उपपुरवठादाराला शक्य व्हावे म्हणून खेळते भांडवल म्हणून इपीसी मंजूर करील. मालाचा पुरवठा केल्यानंतर, पतपत्र उघडणारी बँक, आंतरदेशीय पतपत्रांच्या आधारावर प्राप्त झालेल्या आंतरदेशीय कागदपत्रांच्या समक्ष उपुरवठादाराच्या बँकरला प्रदान करील. अशी प्रदाने नंतर इओएचची इपीसी होतील.

(सी) आवश्यक असलेल्या विविध घटकांसाठी त्याच्या बँकरच्या/बँकांच्या समूहाच्या नेत्याच्या मंजूरीने ऑर्डरच्या किंवा त्याला प्राप्त झालेल्या पतपत्रांच्या एकुण मर्यादेच्या आत कितीहि संख्येतील पतपत्रे उघडणे इओएचवर आहे. प्रचालनीय सोय लक्षात घेऊन, पतपत्र उघडणाऱ्या बँकेने अशा उघडलेल्या पतपत्रासाठी किमान रक्कम निश्चीत करायची आहे. एका किंवा अनेक उपपुरवठादारानी आणि इओएचने प्राप्त केलेल्या पॅकिंग क्रेडिटचा एकूण कालावधी निर्यात केलेल्या मालासाठी आवश्यक असलेल्या उत्पादनाच्या सामान्य चक्राच्या आत असावा. सामान्यपणे, एकुण कालावधी कोणत्याहि एका उपपुरवठादाराने काढलेल्या पहिल्या पॅकिंग क्रेडिटच्या तारखेपासून इओएचने निर्यात कागदपत्रे सादर केल्याच्या तारखेपर्यंत काढण्यात येईल.

(डी) निर्यात ऑर्डर किंवा समुद्रपार पतपत्राप्रमाणे मालाच्या निर्यातीसाठी इओएच जबाबदार असेल आणि त्यातील कोणत्याहि दिरंगाईमुळे त्याला वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या दंडाच्या तरतूदी लागू होतील. एकदा उपपुरवठादाराने आंतरदेशीय पतपत्राच्या अटीनुसार इओएचला माल उपलब्ध करून दिला कि योजनेखालील त्याचे कर्तव्य पूर्ण झाले असे समजण्यात येईल आणि इओएचकडून झालेल्या दिरंगाईसाठी त्याला दंडनीय तरतूदी, काही असल्यास, लागू होणार नाहीत.

(इ) उक्त परिच्छेद १.२.१ मध्ये तपशीलवार दिलेल्या निर्यात केलेल्या मालाच्या बाबतीतील इओएच आणि निर्माता यांच्यात पॅकिंग क्रेडिट विभागून घेण्याच्या विद्यमान पद्धती व्यतिरिक्त योजना ही अतिरिक्त खिडकी आहे. या योजनेत उत्पादनाचे केवळ पहिले चक्र समाविष्ट असेल. उदाहरणार्थ, निर्माता निर्यातदाराला निर्यातयोग्य मालाच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या घटकांच्या वगैरे त्याच्या लगेचच्या पुरवठादाराच्या नावे पतपत्र उघडण्यास परवानगी देण्यात येईल. अशा लगेचच्या पुरवठादाराला कच्चा माल/घटक वगैरेचा पुरवठा समाविष्ट करण्यासाठी योजनेचा लाभ दिला जाणार नाही. जर इओएच हे केवळ व्यापारी गृह असेल, सुविधा व्यापारी गृहाने ज्या निर्मात्याकडे ऑर्डर पुढे पाठविली आहे त्याच्यापासून सुरवात करून उपलब्ध असेल.

(एफ) निर्यातीच्या हेतूने अन्य इओयू/इपीझेड/एसइझेड ला पुरवठा करणारी इओय/इपीझेड/एसइझेड युनीटस सुद्धा या योजनेखाली नौप्रेषपूर्व रुपया निर्यात क्रेडिटसाठी पात्र असतील. परंतु, पुरवठादार इओय/इपीझेड/एसइझेड युनीट कोणत्याहि नौप्रेषपश्चात सुविधेला पात्र नसतील कारण या योजनेत क्रेडिटच्या अटीवर मालाच्या पुरवठ्याचा समावेश नाही.

(जी) अग्रिमाच्या एकूण राशीत किंवा कालावधीत कोणताहि बदल योजनेत पुढे संभाव्य दिसत नाही. त्यानुसार, या पद्धतीखाली दिलेले क्रेडिट उपपुरवठादाराला अग्रिम दिल्याच्या तारखेपासून इओएचने आंतरदेशीय निर्यात पतपत्र पद्धतीखाली परिसमापन केल्याच्या तारखेपर्यंत आणि इओएच द्वारा मालाच्या नौप्रेषाद्वारे पॅकिंग क्रेडिटच्या परिसमापनाच्या तारखेपर्यंत निर्यात क्रेडिट मानण्यात येईल आणि उचित कालावधीसाठी संबंधित बँकेद्वारे आरबीआयकडून पुनर्वित्तपुरवठ्याला पात्र असेल. व्यवहाराच्या त्याच पायरीवर दुहेरी वित्तपुरवठा केला जात नाही याची त्यानी काळजी घेतली पाहिजे.

(एच) अशा अग्रिमांच्या बाबतीत योग्य ते संरक्षण प्राप्त करण्यासाठी बँका इसीजीसी कडे जाऊ शकतात.

(आय) योजनेत पुढे उपपुरवठादाराने इओएच/निर्मात्याला क्रेडिट देणे दिसत नाही आणि अशा प्रकारे, उपपुरवठादाराला पतपत्र उघडणाऱ्या बँकेने कागदपत्रे सादर केल्यानंतर, प्रदान इओएचची इपीसी असे समजून. प्रदान केले पाहिजे.

१.२.३ <u>बांधकाम कंत्राटदाराना रुपया नौप्रेषपूर्व क्रेडिट</u>

(१) बांधकाम कंत्राटदाराना विदेशातील कंत्राटाच्या कार्यवाहीसाठी त्यांच्या प्रारंभिक खेळत्या भांडवलाच्या गगजा भागविण्यासाठी पॅकिंग क्रेडिट अग्रिमे, विदेशातून निश्चीत स्वरुपात मिळविलेल्या कंत्राटाच्या आधारावर, स्वतंत्र खात्यात, त्यांच्याकडून त्याना हा वित्तपुरवठा कंत्राटाच्या कार्यवाहीच्या संबंधातील प्राथमिक खर्च करण्यासाठी म्हणजेच आवश्यक तो तांत्रिक कर्मचारी वर्ग तेथे नेण्यासाठी आणि विदेशातील कंत्राटाच्या कार्यवाहीसाठी, उपयुक्त साहित्याच्या खरेदीसाठी आवश्यक आहे असे वचनपत्र घेऊन, देता येतील.

(२) अग्रिमांच्या तारखेपासून ३६५ दिवसांच्या आत कंत्राटाशी संबंधित बिलांच्या वाटाघाटीतून किंवा विदेशात कार्यवाही केलेल्या कंत्राटाच्या संबंधात विदेशातून प्राप्त वित्तप्रेषणाद्वारे अग्रिमे समायोजित केली पाहिजेत. ठरवून दिलेल्या पद्धतीने समायोजित न केलेल्या थकित रकमेपर्यंत, बँका अशा अग्रिमांवर सामान्य व्याजाचा दर आकारू शकतात.

(३) सेवेच्या कंत्राटासह प्रकल्प निर्यातीचे कंत्राट घेणाऱ्या निर्यातदारानी, विदेशी विनिमय विभाग, भारतीय रिझर्व बँक, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यानी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची-सूचनांची पूर्तता करावी.

१.२.४ <u>सेवांची निर्यात</u>

जनरल ॲग्रीमेंट ऑन ट्रेडमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व १६१ ट्रेडेबल सेवांच्या निर्यातदाराना, जेथे अशा सेवांसाठी प्रदाने विदेशी व्यापार धोरण २००९-१४ च्या प्रकरण ३ मध्ये प्रतिपादित केल्याप्रमाणेमुक्त विदेशी चलनात प्राप्त झाले असेल, नौप्रेषपूर्व आणि नौप्रेषपश्चात वित्तपुरवठा करण्यात यावा. या परिपत्रकातील सर्व तरतूदी अन्यथा विनिर्दिष्टीत केलेल्या असल्याखेरीज, मालाच्या निर्यातीला त्या लागू होतात तशाच सेवांच्या निर्यातीला योग्य त्या फेरफारांसह लागू होतील. सेवांची एक सूची विदेशी व्यापार धोरण २००४-२००९ च्या पुस्तिके(खंड ३)च्या परिशिष्ट १० मध्ये दिली आहे. वित्तपुरवठा करणाऱ्या बंकेने खात्री करावी कि दुहेरी वित्तपुरवठा केला जात नाही आणि निर्यात क्रेडिटचे परिसमापन विदेशातील वित्तप्रेषणाद्वारे केले जात आहे. निर्यात क्रेडिट मंजूर करताना बँकानी निर्यातदाराचा/समुद्रपार समोरच्या पक्षाचा पूर्वेतिहास विचारात घ्यावा. अशा सेवा पुरवठादाराच्या प्राप्य निर्यातीच्या विवरणपत्राचा समुद्रपार पक्षाच्या प्राप्य प्रदानांच्या विवरणपत्राशी मेळ घालावा.

व्यवसायाची विविध स्वरुपे असलेल्या सेवा निर्यातीच्या प्रवर्गांची मोठी संख्या लक्षात घेऊन त्याचप्रमाणे क्रमवर्धी अनियामकतेच्या वातावरणात जेथे मायक्रोमॅनेजमेंटच्या संबंधातील विषयांबाबत निर्णय घेणे प्रत्येक बँकेवर सोडण्यात आले आहे, बँका सेवांच्या निर्यातीसाठी स्वतःचे मापदंड निश्चीत करू शकतात.

सेवांचे निर्यातदार उपयोगी साहित्य, पगार, पुरवठ वगैरे साठी खेळत्या भांडलाच्या निर्यात क्रेडिट(नोप्रेषपूर्व आणि नौप्रेषपश्चात) साठी अर्हतापात्र आहेत.

बँकानी खात्री करून घ्यावी कि,

- सेवांच्या निर्यातीचा प्रस्ताव प्रामाणिक आहे.
- सेवा निर्यातीची बाब एचबीपीव्ही १ चे परिशिष्ट १०

- निर्यातदार एक्सपोर्ट प्रमोशन कौंसिलकडे सेवांसाठी लागू असेल त्याप्रमाणे इलेक्ट्रॉनिक आणि सॉफ्टवेयर ईपीसी किंवा सेवा ईएपीसी किंवा भारतीय निर्यात संघटना महासंघ नोंदणीकृत आहे.

- त्याच्याकडे सेवांच्या निर्यातीसाठी निर्यात कंत्राट आहे.
- खेळत्या भांडवलाचा खर्च आणि विदेशातील सेवा ग्राहक किंवा त्याचा मुख्य यांच्याकडून प्रत्यक्ष प्रदानात वेळेचा व्यय आहे.
- खेळत्या भांडवलातील अंतर वैध आहे म्हणजेच आधी सेवा पुरविण्यात येते आणि त्यानंतर बीजक तयार केल्यानंतर काही काळाने प्रदान प्राप्त होते.
- बँकानी खात्री करून घ्यावी कि दुहेरी वित्तपुरवठा/अधिकांशाने वित्तपुरवठा केला जात नाही.
- मंजूर केलेले निर्यात क्रेडिट अर्जित विदेशी चलन वजा काही असल्यास मार्जीन, प्राप्त झालेले अग्रिम प्रदान-क्रेडिट यापेक्षा बाहेर जात नाही.
- बीजके तयार केली आहेत.
- आवक वित्तप्रेषण विदेशी चलनात प्राप्त होत झाले आहे.
- जेथे समुद्रपार पक्षाकडून प्रदान प्राप्त होते तेथे कंपनी कंत्राटानुसार बीजक तयार करील, सेवा पुरवठादार बँकेकडून प्राप्त केलेल्या निर्यात क्रेडिटच्या परतफेडीसाठी निधीचा विनियोग करील.

१.२.५ फुलोत्पादन, द्राक्षे आणि अन्य शेती-आधारित उत्पादनांसाठी नौप्रेषपूर्व क्रेडिट

(१) फुलोत्पादनाच्या बाबतीत, कट-फ्लॉवर्सच्या खरेदीसाठी वगैके आणि पीक आल्यानंतर नौप्रेष करण्यासाठी कराव्या लागलेल्या खर्चासाठी नौप्रेषपूर्व क्रेडिट देण्यासाठी बँकाना परवानगी आहे.

(२) परंतु, फुलोत्पादन, द्राक्षे आणि अन्य शेती-आधारित उत्पादनांच्या निर्यातीच्या प्रवर्तनाच्या दृष्टीने, खतांची, जंतूनाशकांची आणि फुलांच्या, द्राक्षांच्या वाढीसाठी अन्य निविष्टीची खरेदी यासह शेतीःआधारित उत्पादनांच्या सर्व निर्यात-संबंधी कार्यांसाठी खेळत्या भांडवलाच्या हेतूने, बँका अशी कार्ये निर्यातीशी संबधित आहेत हे स्पष्टपणे जाणून घेण्याच्या आणि त्यातील निर्यातीच्या क्षमतेबाबात स्वतःचे समाधान करून घेण्याच्या स्थितीत असतील, आणि ही कार्ये नाबार्ड किंवा अन्य एजन्सीच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वित्तपुरवठ्याच्या योजनेत समाविष्ट नसतील तर, पॅकिंग क्रेडिटशी संबंधित कालावधी, राशी, परिसमापन वगैरे सारख्या सामान्य अटी आणि शर्तींच्या अधीन, बँकाना सवलतीच्या दराने क्रेडिट देण्यास परवानगी आहे.

(३) निर्यात क्रेडिट, विदेशी तंत्रज्ञानाची आयत, उपकरणे, जमीनीचा विकास वगैरेसारख्या गुंतवणूकीसाठी किंवा अन्य कोणतीहि बाब जिला खेळते भांडवल म्हणता येणार नाही, त्यासाठी देऊ नये.

१.२.६ प्रोसेसर्स/निर्यातदार/ॲग्री/इएक्सपीार्ट झोन्सना निर्यात क्रेडिट

(१) शेतीमालाच्या उत्पादनाच्या प्रवर्तनासाठी भारत सरकारने देशात ॲग्री –इएक्सपीार्ट झोन्स स्थापन केले आहेत. अशा युनीटस्च्या ॲग्री-इएक्सपीार्ट झोनस् मध्ये तसेच झोनच्या बाहेर ॲग्री-इएक्सपीार्ट ओरिएन्टेड युनीटस् (प्रक्रिया) स्थापन करण्यात आली आहेत आणि अशा युनीटसच्या प्रवर्तनासाठी, उत्पादन आणि प्रक्रिया एकत्रित करायची आहे. उत्पादकाने शेतकऱ्यांबरोबर शेतीचा करार केला पाहिजे आणि निर्यातीसाठी अंतिम उत्पादनाच्या निर्मितीसाठी कच्या माल म्हणून ज्या शेतकऱ्यांच्या गटाकडून निर्यातदार उत्पादन खरेदी करणार असेल त्याना दर्जेदार खते, जंतूनाशके, मायक्रो-न्यूट्रिएंटस आणि अन्य सामग्रीच्या पुरवठ्याची त्याने खात्री केली पाहिजे. म्हणून सरकारने सुचविले आहे कि, अशा प्रक्रिया युनीटसना प्रापणाच्या आणि शेतकऱ्याना निविष्टीचा पुरवठा करण्याच्या हेतूने अस्तित्वातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार पॅकिंग क्रेडिट देण्यात यावे जेणेकरून त्याना चांगली दर्जेदार निविष्टी उपलब्ध होऊ शकेल आणि परिणामी केवळ चांगल्या दर्जाचे पीक काढण्याची खात्री मिळू शकेल. निर्यातदाराना अशी निविष्टी एकगठ्ठा खरेदी/आयात करणे शक्य होईल, ज्यात प्रमाणाच्या अर्थव्यवस्थेवर फायदा असेल.

(२) निर्यातदारानी शेतकऱ्याला पुरविलेली निविष्टी बँका कच्चा माल मानू शकतात आणि शेती उत्पादनांच्या निर्यातीच्या प्रवर्तनासाठी अशी पिकांच्या लागवडीसाठी शेतकऱ्याला आवश्यक असलेल्या अशा निविष्टीचा खर्च सामावून घेण्यासाठी क्रेडिट-निर्यात क्रेडिटच्या धर्तीवर प्रोसेसर्सना/निर्यातदाराना मंजूर करण्याचा विचार करू शकतात. प्रक्रिया युनीट निविष्टीची एकगठ्ठा खरेदी करू शकते आणि पूर्व-निश्चीत व्यवस्थेनुसार ती शेतकऱ्याना पुरवू शकते.

(३) बँकानी खात्री करून घेतली पाहिजे कि, खरेदी करायच्या पिकाबाबत आणि निर्यात करायच्या उत्पादनाबाबत अनुक्रमे शेतकरी आणि समुद्रपार खरेदीदार यांच्या बरोबर आवश्यक ती व्यवस्था केलेली आहे. वित्तपुरवठा करणारी बँक ॲग्री-इएक्सपीोर्ट झोनमधील प्रकल्पांचे मूल्यन सुद्धा करील आणि खात्री करील कि सामंजस्य करार टिकाऊ आहेत आणि प्रकल्प उचित कालावधीत सुरू होतील.

(४) त्यानी निधीच्या अंतिम उपयोगाचेहि म्हणजेच निर्यातदाराने/मुख्य प्रक्रिया युनीटने केलेल्या व्यवस्थेप्रमाणे पीक घेण्यासाठी शेतकऱ्याना निर्यातदाराद्वारे निविष्टीच्या वितरणाचे संनियंत्रणहि करावे.

(५) त्यापुढे त्यानी याचीहि खात्री करून घ्यायला हवी कि अस्तित्वातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार नौप्रेषपूर्व क्रेडिटच्या परिसमापनाच्या दृष्टीने मंजूरीच्या अटी आणि शर्तीप्रमाणे प्रोसेसर/निर्यातदार अंतिम उत्पादन निर्यात करतील.

## २. <u>नौप्रेषपश्चात निर्यात क्रेडिट</u>

### २.१ <u>व्याख्या</u>

'निर्याती नंतरची पत' म्हणजे एफईडीद्वारे निर्धारित करण्यात आलेल्या प्रत्यक्षात आणण्याच्या कालावधीप्रमाणे निर्यात सुविधा प्रत्यक्षात येण्याच्या दिनांकापर्यंत साहित्याची/सेवांची निर्यात केल्यानंतर त्यांना मिळालेल्या वाढीव पत आणि साहित्याच्या निर्यातीच्या दिनांकाला भारतातून निर्यात करण्यासाठी बँकेद्वारे देण्यात आलेले कोणतेही कर्ज किंवा अग्रिम रक्कम होय; आणि त्यामध्ये वेळोवेळी सरकारद्वारे अनुमती देण्यात आलेली सुरक्षा रक्कम किंवा अन्य दायित्वातील कमतरता लक्षात घेऊन कोणत्याही निर्यातदाराला देण्यात आलेले कोणतेही कर्ज किंवा अग्रिम रकमा ह्यांचा समावेश होतो. एफईडीच्या वर्तमान निर्देशांनुसार, निर्यात प्रोसीडसच्या प्रत्यक्षात येण्यासाठीचा कालावधी पाठवण्याच्या दिनांकापासून १२ महिन्यांमध्ये आहे.

### २.२ नौप्रेषपश्चात क्रेडिटचे प्रकारः

नौप्रेषपश्चात क्रेडिट मुख्यत्वे केवळ खालील स्वरुपात असू शकते-

(१) खरेदी केलेली/डिस्काउंट केलेली/वाटघाटी केलेली निर्यात बिले
(२) गोळा करण्यासाठी बिलांच्या समक्ष अग्रिमे
(३) सरकराकडून प्राप्य असलेल्या करप्रतिग्रहासमक्ष अग्रिमे

### २.३ <u>नौप्रेषपश्चात क्रेडिटचे परिसमापनः</u>

निर्यातदारांचा खर्च (म्हणजे थकित निर्यात बिलांवरील व्याज दर) कमी करण्यासाठी थकित निर्यात बिले असलेले निर्यातदार त्यांच्या रुपयामधील संसाधानांमधून त्यांचे पाठवणीनंतरचे थकित कर्ज चुकते करू शकतात. परंतु तरीही, सध्याचा जीआर प्रकार थकित राहील आणि ही रक्कम एक्सओएस विधानामध्ये थकित म्हणून दाखवण्यात येईल. जोपर्यंत निर्यात बिल दिले जात नाही, तोपर्यंत ते देण्याची निर्यातदाराचे दायित्व चालू राहील.

### २.४ <u>नौप्रेषपश्चात रुपया निर्यात क्रेडिट</u>

#### २.४.१ <u>कालावधी</u>

(१) मागणी बिलांच्या बाबतीत, अग्रिमांचा कालावधी एफइडीएआय द्वारे विनिर्दिष्टीत केल्याप्रमाणे नॉर्मल ट्रांन्झिट पिरियड(एनटीपी) असावा.

(२) उपयोग बिलांच्या बाबतीत, क्रेडिट नौप्रेषाच्या तारखेपासून नॉर्मल ट्रांन्झीट पिरियड(एनटीपी) आणि वाढीव कालावधी, काही असल्यास, त्यासह कमाल ३६५ दिवसांच्या कालावधीसाठी मंजूर करता येईल. तथापि, बँकानी अनुज्ञेय ३६५ दिवसांच्या कालावधीसाठी नौप्रेषपश्चात क्रेडिट देण्याच्या गरजेचे संनियंत्रण करावे आणि त्यांनी निर्यातदारावर कमीत कमी कालावधीत निर्यातीच्या उत्पन्नाच्या वसूलीसाठी वजन टाकावे.

(३) "नॉर्मल ट्रांन्झीट पिरियड" म्हणजे वाटाघाटीच्या/खरेदीच्या/डिस्काउंटच्या तारखेपासून संबंधित बंकेच्या नोस्ट्रो खात्यात बिलांच्या उत्पन्नाची प्राप्ती होईपर्यंत, एफइडीएआयने वेळोवेळी विहीत केल्याप्रमाणे साधारणपणे लागणारा सरासरी कालावधी. त्याची समुद्रपार ठिकाणावर माल योण्यासाठी लागलेल्या वेळेशी गल्लत करू नये.

(४) तारीख उलटून गेलेले बिल

(ए) मागणी बिलाच्या बाबतीत, असे बिल ज्याचे नॉर्मल ट्रान्झीट पिरियड अधिक वाढीव कालावधीच्या समाप्तीपूर्वी प्रदान झालेले नाही आणि

(बी) उपयोग बिलांच्या बाबतीत, असे बिल ज्याचे देय तारखेला प्रदान झालेले नाही.

२.४.२ <u>व्याज दराची रचना</u>

नौप्रेषपश्चात क्रेडिट वरील व्याज दराची रचना आणि त्यासंबंधातील सूचना परिच्छेद ४ मध्ये तपशीलवार दिल्या आहेत.

२.४.३ <u>निर्यात बिलावरील न काढलेल्या शिलकीसमक्ष अग्रिमे</u>

काही वस्तूंच्या निर्याचीच्या बाबतीत जेथे निर्यातदारानी कंत्राटाच्या एफओबी मूल्याच्या ९० ते ९८ टक्क्यांपर्यंत समुद्रपार खरेदीदारावर बिले काढणे आवश्यक असते, अवशिष्ट रक्कम ही न काढलेली शिल्लक असल्यामुळे समुद्रपार खरेदीदाराने मालाची राशी-दर्जा याबाबत स्वतःचे समाधान करून घेतल्यानंतर, देय असते. न काढलेल्या बिलाचे प्रदान घटनापेक्ष स्वरुपाचे असते. बँका त्यांच्या व्यावसायिक अनुमानाच्या आणि खरेदीदाराच्या पूर्वेतिहासाच्या आधारावर न काढलेल्या बिलांच्या समक्ष सवलतीच्या व्याजाच्या दराने अग्रिम मंजूर करण्याबाबत विचार करू शकते. तथापि, अशी अग्रिमे, त्यांची विदेशातून प्रत्यक्ष वित्तप्रेषणाद्वारे परतफेड केल्याच्या मर्यादेपर्यंत आणि मागणी बिलांच्या बाबतीत एनटीपीच्या समाप्तीनंतर १८० दिवसांच्या आत आणि उपयोग बिलांच्या बाबतीत देय तारखेच्या आत अशी वित्तप्रेषणे प्राप्त झाली तर, केवळ कमाल ९० दिवसांच्या कालावधीसाठी सवलतीच्या व्याज दराला पात्र असतील. ९० दिवसांच्या वरील कालावधीसाठी, नौप्रेषपश्चात टप्प्यातील ।इसीएनओएस। प्रवर्गासाठी विनिर्दिष्टीत केलेल्या व्याजाच्या दराने व्याज आकारले जाईल.

२.४.४ <u>रिटेन्शन मनीच्या समक्ष अग्रिमे</u>

(१) टर्न की प्रकल्प-बांधकाम कंत्राटाच्या बाबतीत, क्रमवर्धी प्रदानाची एक छोटीशी टक्केवारी रिटेन्शन मनी म्हणून ठेवून, जी विनिर्दिष्टीत प्राधीकाऱ्याकडून प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या अधीन पूर्ततेच्या तारखेपासून ठरवून दिलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर देय असते, समुद्रपार वापरदार कंत्राटाच्या सेवा विभागाच्या संबंधात क्रमवर्धी प्रदान करतात.

(२) कधीकधी रिटेन्शन मनी टर्न-की प्रकल्पांच्या बाबतीत पुरवठ्याच्या भागासमक्षहि ठरविला जातो. त्याचप्रमाणे तो उप-कंत्राटांच्या बाबतीत सुद्धा उद्‌भवू शकतो. रिटेन्शन मनीचे प्रदान धटनापेक्ष स्वरुपाचे असते कारण ते दोष दायित्व आहे.

(३) रिटेन्शन मनीच्या समक्ष अग्रिमे मंजूर करताना खालील मार्गदर्शक तत्त्वांचे अनुसरण करावेः

- (ए) कंत्राटाच्या सेवा भागाशी संबंधित रिटेन्शन मनीच्या समक्ष कोणतेही अग्रिम मंजूर करू नये.
- (बी) निर्यातदाराना, शक्यतोवर, रिटेन्शन मनीच्या ऐवजी, योग्य प्रकारच्या हमीची व्यवस्था करण्याचा सल्ला द्यावा.
- (सी) बँकानी, निवडक तत्त्वावर, इतर बाबींबरोबर, जमा झालेला रिटेन्शन मनी, निर्यातदाराच्या रोख निधीवरील त्याचा परिणाम आणि रिटेन्शन मनी वेळेवर प्राप्त होण्याबाबत पूर्वीचे कार्य

विचारात घेऊन कंत्राटाच्या पुरवठा भागाशी संबंधित रिटेन्शन मनीच्या समक्ष अग्रिमे मंजूर करण्याचा विचार करावा.

(डी) जेथे शक्य असेल तेथे रिटेन्शन मन पतपत्रे किंवा बँकेच्या हमीने सुरक्षित करावा.

(इ) कंत्राटाच्या अटीनुसार जेथे रिटेन्शन मनी नौप्रेषाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत देय असेल, बँकानी कमाल ९० दिवसांच्या कालावधीसाठी विहीत सवलतीचा व्याज दर आकारावा. ९० दिवसानंतरच्या कालावधीसाठी नौप्रेषपष्चात टप्प्यावर ।इसीएनओएस। प्रवर्गासाठी विहीत केलेला व्याजाचा दर आकारावा.

(एफ) कंत्राटाच्या अटीनुसार जेथे रिटेन्शन मन नौप्रेषाच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीनंतर देय असेल आणि तदनुरूप अग्रिम एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी दिलेले असेल, ते स्थगित प्रदानाच्या अटीवर एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी दिलेले नौप्रेषपश्चात क्रेडिट मानण्यात येईल आणि त्या प्रवर्गासाठी व्याजाचा दर लागू होईल.

(जी) रिटेन्शन मनी समक्ष अग्रिमे सवलतीच्या व्याज दराला केवळ रिटेन्शन मनीच्या संबंधात विदेशातून प्राप्त झालेल्या वित्तप्रेषणातून प्रत्यक्ष परतफेड केलेल्या अग्रिमांपर्यंत आणि अशी प्रदाने कंत्राटाच्या अटीनुसार रिटेन्शन मनीच्या देय तारखेपासून १८० दिवसांच्या आत प्राप्त झाली असतील तरच पात्र असतील.

२.४.५ <u>मालप्रेष तत्त्वावर निर्यात</u>

(१) <u>सर्वसाधारण</u>

(ए) मालप्रेष तत्त्वावर निर्यातीत निर्यातीच्या उत्पन्नाच्या प्रत्यावर्तनाच्या विषयात मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करण्याची संधि मिळते.

(बी) म्हणून, नौप्रेषपश्चात क्रेडिटवर बँकानी आकारायच्या व्याजाच्या दराच्या बाबतीतील विषयात मालप्रेष तत्त्वावरील निर्यात रोख अटीवरील संपूर्ण विक्री तत्त्वावरील निर्यातीच्या सममूल्य असावी. अशा प्रकारे, मालप्रेष तत्त्वावर निर्यातीच्या बाबतीत, विदेशी विनिमय विभागाने निर्यातीच्या उत्पन्नाच्या प्रत्यावर्तनासाठी ३६५ दिवसांपेक्षा अधिक वाढ मंजूर केली तरी, बँका, उचित सवलतीचा व्याजाचा दर केवळ नोशनल देय तारखेपर्यंतच(बिलाच्या कालावधीवर अवलंबून), कमाल ३६५ दिवसांपर्यंत, आकारतील.

(२) <u>मूल्यवान आणि अर्ध-मूल्यवान रत्नांची निर्यात</u>

मूल्यवा आणि अर्ध-मूल्यवान रत्ने बहुतांशी मासृलप्रेष तत्त्वावर निर्यात केली जातात आणि निर्यातदार विदेशातून प्राप्त झालेल्या वित्तप्रेषणांद्वारे अग्रिमांच्या तारखेपासून ३६५ दिवसांच्या आत नौप्रेषपूर्व क्रेडिट खाते परिसमापित करण्याच्या स्थितीत नसतो. म्हणून, बँकानी, ज्या क्षणी निर्यात होईल तेव्हा लगेच, मालप्रेष तत्त्वावरील निर्यातीच्या पॅकिंग अग्रिमांच्या बाबतीत विशेष खात्यात (नौप्रेषपश्चात) थकित शिल्लक हस्तांतरित करून ती समायोजित करावीत, जी नंतर विदेशातून संबंधित उत्पन्नाच्या प्राप्तीनंतर लगेच पण निर्यातीच्या तारखेपासून ३६५ दिवसाहून अधिक काळाने किंवा विदेशी विनिमय विभाग, भारतीय रिझर्व बँक यानी अनुज्ञेय केलेल्या कालावधीपेक्षा जास्त नाही अशी समायोजित करावीत. विशेष(नौप्रेषपश्चात) खात्यातील शिल्लक आरबीआयकडून पुनर्वित्तपुरवठ्याला पात्र असणार नाही.

(३) <u>१२-१५ महिन्यांपर्यंतच्या कालावधीसाठी निर्यात उत्पन्नाच्या वसूलीसाठी मुदतवाढ</u>

चांगला पूर्वेतिहास असणाऱ्या व्याक्तिगत निर्यातदारानी अर्ज केल्यावर, लायक प्रकरणात, खालील प्रवर्गातील निर्यातदारांच्या बाबतीत निर्यातीच्या उत्पन्नाच्या वसूलीसाठी नौप्रेषाच्या तारखेपासून १२ महिन्यांपर्यंतच्या अधिक दीर्घ कालावधीसाठी आरबीआय(एफइडी) परवानगी देत आहे.

ए) सीआयएस आणि पूर्व युरोपियन देशाना मालप्रेष निर्याती

बी) स्टेट क्रेडिटच्या रुपयात परतफेडीसमक्ष रशियन फेडरेशनला मालप्रेष निर्याती

सी) विदेशी व्यापार धोरणाुसार ज्या निर्यातदारांना स्टेटस होल्डर म्हणून प्रणित करण्यात आले आहे.

डी) १०० टक्के निर्यातीभिमुख युनीटस आणि इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर टेक्नॉलॉजी पार्क, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क आणि बायो-टेक्नॉलॉजी पार्क योजनेखाली स्थापन केलेली युनीटस.

दिनांक ३१ मार्च २०११ च्या क्र. ४७ च्या परिपत्रकानुसार, एफईडी एपी (डीआयआर मालिका) निर्यात प्रोसीडच्या प्रत्यावर्तनाचा आणि प्राप्तीचा कालावधी निर्यातीच्या दिनांकापासून ६ महिन्यांपासून १२ महिने इतका आणि ३० सप्टेंबर २०११ पर्यंतच्या वाढीव कालावधीसाठी वाढवण्यात आला आहे आणि त्याची आरबीआयद्वारे (एमपीडी) जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे समीक्षा केली जाईल.

त्याशिवाय, विदेशातील वेअरहाऊस-कम डिस्प्ले सेंटर्समार्फत निर्यातीच्या बाबतीत, निर्यातीच्या उत्पन्नाच्या वसूलीसाठी नौप्रेषाच्या तारखेपासून १५ महिन्यांपर्यंतचा कालावधी निश्चीत करण्यात आला आहे.

बँका अशा निर्यातदाराना दीर्घ कालावधीसाठी प्रारंभापासून नौप्रेषपश्चात क्रेडिट देऊ शकतात. त्यानुसार, अग्रिमाच्या तारखेपासून १८० दिवसांपर्यंत व्याजाचा दर उपयोग बिलांसाठी १८० दिवसोपर्यंतच्या कालावधीसाठी लागू असलेला असेल. नौप्रेषाच्या तारखेपासून १८० दिवसांच्या वर, बँका व्याजाचा दर निश्चीत करण्यास मुक्त आहेत. मंजूर केलेल्या कालावधीच्या आत जर विक्रीचे उत्पन्न वसूल झाले नाही तर, नौप्रेषपश्चात 'इसीएनओएस' साठी लागू असल्याप्रमाणे व्याजाचा दर १८० दिवसांच्या वरील संपूर्ण कालावधीसाठी लागू होईल.

तथापि, निर्यात क्रेडिटच्या समक्ष बँकाना, केवळ नौप्रेषपूर्व आणि नौप्रेषपश्चात टप्प्यावर प्रत्येकी १८० दिवसांच्या कालावधीपर्यंतच आर बी आय (एम यी डी) कडुन दिलेल्या मार्गदर्शनां प्रमाणे पुनर्वित्तपुरवठा उपलब्ध असेल

२.४.६ <u>प्रदर्शने आणि विक्रीसाठी निर्यात</u>

निर्यातदाराना प्रदर्शन आणि विक्रीसाठी विदेशात पाठविलेल्या मालाच्या समक्ष बँका पहिल्या प्रसंगात सामान्य पद्धतीने वित्तपुरवठा करू शकतील, आणि विक्री पूर्ण झाल्यानंतर, नौप्रेषपूर्व आणि नौप्रेषपश्चात अशा दोन्ही टप्प्यांवर, ठरविलेल्या कालावधीपर्यंत, सूट देऊन, अशा अग्रिमांवर सवलतीच्या व्याजाच्या दराचा लाभ अनुज्ञेय करतील. अशी अग्रिमे वेगळ्या खात्यात द्यावीत.

२.४.७ <u>स्थगित प्रदान तत्त्वावर नौप्रेषपश्चात क्रेडिट</u>

आरबीआय(एफइडी)द्वारा वेळोवेळी विनिर्दिष्टीत केल्याप्रमाणे भांडवली माल आणि उत्पादक मालाच्या निर्यातीच्या बाबतीत, बँका एक वर्षाहून अधिक कालावधीसाठी स्थगित प्रदान तत्त्वावर नौप्रेषपश्चात क्रेडिट मंजूर करू शकतील.

## २.५ करप्रतिग्रहाच्या पात्रतेसमक्ष नौप्रेषपश्चात क्रेडिट

२.५.१ बँका निर्यातदाराना त्यांच्या, अंतिम मंजूरी आणि प्रदान प्रलंबित असताना कस्टम्स अधिकाऱ्यानी तात्पुरत्या स्वरुपात प्रमाणित केल्याप्रमाणे करप्रतिग्रहाच्या पात्रतेसमक्ष नौप्रेषपश्चात अग्रिमे मंजूर करू शकतील.

२.५.२ निर्यातदाराना प्राप्य करप्रतिग्रहासमक्ष अग्रिमे कस्टम्स विभागाने निर्गमित केलेल्या इजीएम क्रमांक समविष्ट असलेल्या नौप्रेष बिलाच्या प्रवर्तन प्रतीसमक्षहि उपलबअद करता येतील. जेथे आवश्यक तेथे, वित्तपुरवठा करणारी बँक निर्धारित बँकेकडे आपला धारणाधिकार नोंदवून घेऊ शकते आणि निर्धारित बँकेबरोबर जेव्हा केव्हा कस्टम्सद्वारा करप्रतिग्रह जमा केला जाईल तेव्हा निधी वित्तपुरवठा करणाऱ्या बँकेकडे हस्तांतरित करण्याची व्यवस्था करू शकते.

२.५.३ करप्रतिग्रहाच्या पात्रतेसमक्ष मंजूर केलेली ही अग्रिमे सवलतीच्या व्याज दराला आणि अग्रिमांच्या तारखेपासून ९० कमाल दिवसांपर्यंतच्या कालावधीसाठी आरबीआयकडून पुनर्वित्तपुरवठ्याला पात्र असतील.

## २.६ इसीजीसी संपूर्ण उलाढाल नौप्रेषपश्चात हमी योजना

२.६.१ इएक्सपीोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया(इसीजीसी)ची संपूर्ण उलाढाल नौपश्चात हमी योजना बँकाना निर्यादतदारानी नौपश्चात क्रेडिटचे प्रदान न करण्यासमक्ष संरक्षण पुरविते. निर्यातीच्या प्रवर्तनाच्या हितार्थ, बँकानी संपूर्ण उलाढाल नौपश्चात पॉलीसीच्या पर्यायाचा विचार करावा. योजनेची ठळक वैशिष्ट्ये इसीजीसीकडून प्राप्त करता येतील.

२.६.२ नौप्रेषपश्चात हमी ही मुख्यत्वे बँकांच्या पायद्यासाठी असल्याने, बँकानी घेतलेल्या संपूर्ण उलाढाल नौप्रेषपश्चात हमीच्या संदर्बातील अधिमूल्याचा खर्च बँकानी करावा आणि तो निर्यातादाराना आकारू नये.

२.६.३ जेथे जोखीम इसीजीसीद्वारे संरक्षित आहे, बँकानी दीर्घकालीन थकित निर्यात बिलांच्या त्यांच्या देय रकमांच्या वसूलीच्या त्यांच्या प्रयत्नात ढिलाई येऊ देऊ नये.

## ३. मानीव निर्यात - सवलतीचे रुपया निर्यात क्रेडिट

३.१ विदेशी व्यापार धोरणात ‘‘मानीव निर्यात’’ प्रकरणाअधीन आर्थिक व्यवहार विभागाने वेळोवेळी अधिसूचित केल्याप्रमाणे द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय एजन्सीज-फंडानी (जागतिक बँक, आयबीआरडी, आयडीए सहित) मदत-वित्तपुरवठा केलेले प्रकल्प, जे पक्ष भारत सरकारकडून सामान्य निर्यात फायद्याना पात्र आहेत त्यांच्या बाबतीत पुरवठ्याच्या ऑर्डरच्या समक्ष सवलतीच्या व्याज दराने नौप्रेषपूर्व आणि नौप्रेषपश्चात रुपया क्रेडिट देण्यास बँकाना परवानगी आहे.

३.३ पुरविलेले पॅकिंग क्रेडिट या एजन्सीजना मालाच्या पुरवठ्यासाठी प्रदानाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या मुक्त विदेशी चलनातून समायोजित करता येईल. त्याची एक्स्चेंज अर्नर्स फॉरिन करंसी अकाउंट (इइएफसी खाते) मधील शिलकीतून त्याचप्रमाणे निर्यातदाराच्या रुपया स्त्रोतातून प्रत्यक्षात केलेलल्या पुरवठ्याच्या मर्यादेपर्यंत परतफेड/पूर्वप्रदान करता येईल.

३.३ बँका मंजूर करू शकतील

(१) नौप्रेषपूर्व रुपया क्रेडिट, आणि

(२) विदेशी व्यापार धोरणाच्या त्याच प्रकरणाअधीन ‘‘मानीव निर्यात’’ म्हणून वेळोवेळी विनिर्दिष्टीत केलेल्या मालाच्या पुरवठ्यासाठी पुरवठा-पश्चात क्रेडिट (कमाल ३० दिवसांचा कालावधी किंवा माल प्राप्त करणाऱ्याकडून प्रत्यक्ष प्रदेन प्राप्त झाल्याची तारीख यापैकी जे आधी असेल).

३.४ पुरवठापश्चात अग्रिमे ३० दिवसांच्या कालावधीनंतर तारीख उलटून गेलेली मानण्यात येतील. ज्या प्रकरणात अशी तारीख उलटून गेलेली नोशनल तारखेपासून १८० दिवसांच्या(म्हणजेच अग्रिमांच्या तारखेपासून २१० दिवसांपूर्वी) आत परिसमापित केली जातील, बँकानी अशा वाढीव कालावधीसाठी, प्रवर्ग ‘‘इसीओएनओएस’’ नौप्रेषपश्चात टप्प्यावर विहीत केलेला व्याजाचा दर आकारणे आवश्यक आहे. जर, बिलांचे प्रदान उक्त नमूद केलेल्या २१० दिवसांच्या कालावधीच्या आत करण्यात आले नाही तर बँकानी ‘‘इसीओएनओएस’’ नौप्रेषपश्चातसाठी विहीत केलेला दर अग्रिमांच्या तारखेपासून आकारावा.

३.५ अशा प्रकारे दिलेल्या रुपया निर्यात क्रेडिटसाठी आरबीआयकडून पुनर्वित्तपुरवठ्याला बँका पात्र असतील पण नौप्रेषपूर्व आणि नौप्रेषपश्चात टप्प्यावर

## ४. निर्यात क्रेडिटवर व्याज

### ४.१ सर्वसाधारण

प्रत्येक बँकेच्या स्थानिक ऋणकोना उपलब्ध असलेल्या बेंचमार्क प्राइम लेंडिंग रेटस(बीपीएलआर) शी जोडलेल्या रुपया निर्यात क्रेडिटसाठी मर्यादा दर विहीत केलेला आहे. त्यामुळे बँकाना, विनिर्दिष्टीत मर्यादेच्या अधीन आकारायचा प्रत्यक्ष दर ठरविण्याचे स्वातंत्र्य आहे. त्याशिवायनिर्यात क्रेडिटच्या कोणत्याहि प्रवर्गाअधीन वेगवेगळ्या टाइम बकेटससाठी मर्यादा दर निर्यात क्रेडिटच्या संपूर्ण कालावधीशी संबंधित बीपीएलआरच्या आधारावर असावा.

**१ जुलै २०१० पासून लागू पाया दर व्यवस्था लागू आहे. त्यानुसार, १ जुलै २०१० रोजी किंवा त्यानंतर रुपयाची निर्यात कर्ज घेणा-या सर्व टेनर्सना लागू असलेले व्याज दर पाया दराइतके किंवा त्याहून अधिक आहेत.**

इसीएनओएस

एसीएनओएस म्हणजे व्याज दराच्या रचनेत अन्यथा विनिर्दिष्टीत न केलेले निर्यात क्रेडिट (इएक्सपीर्ओट क्रेडिट नॉट अदरवाइज स्पेसिफाइड) ज्यासाठी बँका बीपीएलआर आणि विस्तारित मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेऊन व्याजाचा दर ठरविण्यास मुक्त आहेत. इसीएनओसच्या बाबतीत बँकानी दंडनीय व्याज आकारू नये.

## ४.२ रुपया निर्यात क्रेडिटवर व्याज दर

### ४.२.१ व्याज दराची रचना

पाया दर प्रणाली १ जुलै २०१० पासून लागू आहे. त्याप्रमाणे, रुपयातील निर्यात कर्जाच्या अग्रिम रकमा १ जुलै २०१० रोजी किंवा त्या नंतर मान्य करण्यात आलेल्या सर्व टेनर्सना लागू असलेले व्याज दर पाया दराइतके किंवा अधिक असतील.

खालील निर्यात क्रेडिटच्या प्रवर्गासाठी मे १, २००७ पासून प्रभावाने ऑक्टोबर ३१, २००७ पर्यंत दरसाल व्याजाचे दर बीपीएलआर दर उणे २.५ टक्केवारी पॉइंटसपेक्षा अधिक नसतील.

| | **निर्यात क्रेडिटचा प्रवर्ग** |
|---|---|
| १. | **नौप्रेषपूर्व क्रेडिट (अग्रिमाच्या तारखेपासून)** |
| | (ए) २७० दिवसांपर्यंत |
| | (बी) इसीजीसीने संरक्षित सरकारकडून प्राप्य असलेल्या प्रोत्साहनाच्या समक्ष ९० दिवसांपर्यंत |
| २. | **नौप्रेषपश्चात क्रेडिट (अग्रिमाच्या तारखेपासून)** |
| | (ए) ट्रान्झीट कालावधीसाठी मागणी बिलांवर (एफइडीएआयने विनिर्दिष्टीत केल्याप्रमाणे) |
| | (बी) उपयोग बिले (निर्यात बिलांच्या उपयोग कालावधीचा समावेश असलेल्या एकूण कालावधीसाठी, एफइडीएआयने विनर्दिष्टीत केल्याप्रमाणे ट्रान्झीट कालावधी, आणि वाढीव कालावधी, जेथे जेथे लागू असेल. |
| | १) १८० दिवसांपर्यंत<br>२) गोल्ड कार्ड योजनेखालील निर्यातदारांसाठी ३६५ दिवसांपर्यंत. |
| | (सी) सरकारकडून प्राप्य प्रोत्साहनाच्या समक्ष (इसीजीसी हमीने संरक्षित) ९० दिवसांपर्यंत |
| | (डी) न काढलेल्या शिलकीसमक्ष (९० दिवसांपर्यंत) |
| | (इ) नौप्रेषाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत देय असलेल्या रिटेन्शन मनी(केवळ पुरवठा भागासाठी) समक्ष (९० दिवसांपर्यंत) |
| बीपीएलआर बेंचमार्क प्रेइम लेंडिंग रेट<br>टीपः १. हे मर्यादा दर असल्यामुळे, मर्यादा दरापेक्षा कोणताहि कमी दर आकारण्यास बँका मुक्त आहेत.<br>२. उक्त विहीत केल्याप्रमाणे मुदतीच्या बाहेरील निर्यात क्रेडिटच्या उपरोल्लेखित प्रवर्गासाठी व्याजाचे दर नियमानांपासून मुक्त केले आहेत आणि बँका बीपीएलआर दर आणि विस्ताराची मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेडून व्याजाचा दर ठरविण्यास मुक्त आहेत. | |

### ४.२.२ व्याजाचे दर लागू करणे

व्याजाच्या दरात वेळोवेळी केलेली सुधारणा नवीन अग्रिमांना तसेच विद्यमान अग्रिमांना क्रेडिटच्या बाकी कालावधीसाठी लागू करण्यात आले आहेत.

### **४.२.३ पाठवण्याआधीच्या पतवरील व्याज**

१) संपूर्ण प्रवर्गातील निर्यात पतच्या संपूर्ण टेनरशी संबंधित असलेल्या बीपीएलआरच्या आधारे मिळणा-या कमाल मर्यादेतील दरानुसार बँकांनी २७० दिवसांपर्यंतच्या पाठवण्याआधीच्या पतवरील व्याजावर अधिभार लावण्याचा निर्णय घ्यावा. पत कालावधी अग्रिम रकमेच्या दिनांकापासून धारण्यात येईल. हे निर्देश ३० जून २०१० पर्यंत लागू आहेत. १ जुलै २०१० पासून पाया दर प्रणाली लागू असेल आणि त्यानुसार रुपयातील निर्यात कर्जाच्या अग्रिम रकमा दिनांक १ जुलै २०१० रोजी किंवा नंतर प्राप्त करणा-या सर्व टेनर्सना व्याज दर पाया दरानुसर किंवा अधिक दरानुसार लागू असतील.

२) जर अग्रिम रकमेनंतर ३६० दिवसांमध्ये किंवा परिच्छेद १.१.४(i) मध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्यात कागदपत्रांवरील खरेदी, सवलत इत्यादीची बिले व प्रोसीडस सादर केल्यानंतर जर पाठवणीआधीच्या अग्रिम रकमा तरल करण्यात आल्या नाहीत, तर अब इनिशिओ पद्धतीने निर्यात पत व्याज दराच्या निर्धारित दरासाठी पात्र होण्यास ह्या अग्रिम रकमा अक्षम ठरतील.

३) ज्या स्थितींमध्ये पॅकिंग पत मान्यतेच्या मूळ कालावधीच्या पलीकडे वाढवण्यात आले नसेल आणि निर्यात मान्यतेच्या कालावधीनंतर परंतु अग्रिम रकमेच्या ३६० दिवसांच्या आत होत असेल, तर फक्त मान्यता कालावधीपर्यंत निर्यातदार सवलतीच्या दरातील पतसाठी पात्र असेल. उरलेल्या कालावधीसाठी, 'ईसीएनओएस'द्वारे निर्धारित करण्यात आलेले पाठवणीआधीच्या टप्प्यावरील व्याज दर लागू असतील. तसेच, बँकांद्वारे निर्यातदाराला कालावधीमध्ये वाढ न करण्यामागची कारणे सूचित केली जाणे आवश्यक असेल.

४) ज्यावेळी पाठवणीआधीच्या अग्रिम रकमेच्या ३६० दिवसांमध्ये निर्यात होत नसेल, तेव्हा अशा क्रेडिटस 'ईसीएनओएस' म्हटले जाईल आणि बँका अग्रिम रकमेच्या पहिल्या दिवसापासून पाठवणीआधीच्या 'ईसीएनओएस' साठी व्याज दर निर्धारित करू शकतात.

५). जर निर्यात प्रत्यक्षात झालीच नाही, तर बँकांच्या संचालक मंडळाद्वारे प्रमाणित पारदर्शक धोरणाच्या आधारे बँका संबंधित पॅकिंग पत घरेलु कर्ज दर अधिक दंडात्मक व्याज दर लागू करू शकतात.

४.२.४ <u>नौप्रेषपश्चात क्रेडिटवर व्याज,</u>

निर्यात बिलांचे लवकर प्रदान

(१) मागणी बिलांसमक्ष अग्रिमांच्या बाबतीत, नॉर्मल ट्रान्झीट पिरियड(एनटीपी) च्या समाप्तीच्या आधी बिलांची वसूली झाली तर, अग्रिमाच्या तारखेपासून अशा बिलांच्या वसूलीच्या तारखेपर्यंत सवलतीच्या दराने व्याज आकारण्यात येईल. या हेतू साठी मागणी बिलांच्या वसूलीची तारीख बँकेच्या नोस्ट्रो खात्यात उत्पन्न जमा होण्याची तारीख असेल.

(२) उपयोग निर्यात बिलांसमक्ष अग्रिम/क्रेडिटच्या बाबतीत, नोशनल/प्रत्यक्ष तारीख किंवा ज्या तारखेला, ऋणकोच्या/निर्यातदाराच्या भारतातील खात्यात खात्यात जमा होण्याची तारीख विचारात न घेता, बँकेच्या नोस्ट्रो खात्यात निर्यातीचे उत्पन्न जमा होण्याची तारीख, या पैकी जी आधी असेल त्या तारखेपर्यंतच सवलतीचा व्याज दर आकारावा. ज्या प्रकरणांमध्ये, समुद्रपार खरेदीदाराच्या स्वीकृतीमुळे किंवा अन्यथा क्रेडिटच्या प्राप्तीआधी/ताबडतोब योग्य तारीख स्थापित करता येईल, काढलेली नोशनल तारीख काही असली तरी ती विचारात न घेता, प्रत्यक्ष तारीख जर नोशनल देय तारखेच्या आधी येत असेल तर सवलतीचा दर केवळ प्रत्यक्ष देय तारखेपर्यंत लागू करावा.

(३) जेथे वर (२) मध्ये प्रतिपादित केल्याप्रमाणे मागणी बिलाच्या बाबतीत संपूर्ण एनटीपीसाठी किंवा उपयोग बिलाच्या बाबतीत नोशनल/प्रत्यक्ष तारखेपर्यंत व्याज बिलांच्या वाटाघाटी/खरेदी/डिस्काउंटच्या वेळीच गोळा करण्यात आले असेल, वसूलीच्या तारखेपासून एनटीपी/नोशनल देय तारीख/प्रत्यक्ष देय तारीख पर्यंतच्या कालावधीसाठी गोळा केलेले अधिक व्याज ऋणकोंना परत करावे.

### ४.२.५ बीपीएलआर प्रणालीमधील थकित निर्यात बिले

१) निर्यात बिलांच्या संदर्भात, आरबीआयद्वारे निर्धारित कमाल दर मर्यादेतील बँकेद्वारे निर्धारित करण्यात आलेला व्याज दर बिलाच्या विहित दिनांकापर्यंत लागू होईल (मागणी बिलाच्या संदर्भात एनटीपी पर्यंत आणि युसेन्स बिलांच्या संदर्भात निर्धारित कालावधीपर्यंत).

२) विहित दिनांकाच्या पुढील कालावधीसाठी, म्हणजेच थकित कालावधीसाठी, पाठवणीनंतरच्या रुपयातील निर्यात क्रेडिटला लागू असलेला निर्धारित व्याज दर (जो बीपीएलआर वजा २.५% टक्के अंक ह्याहून जास्त नसेल) पुढील सूचना मिळेपर्यंत अग्रिम रकमेच्या दिनांकापासून १८० दिवसांपर्यंत लागू केला जाऊ शकतो.

४.२.६ रुपया स्रोतातून समायोजित केलेले नौप्रेषपश्चात क्रेडिटवरील व्याज

विदेशी चलनाचे अर्जन न झाल्यामुळे मान्याताप्राप्त पद्धतीने समायोजित न केलेल्या आणि संबंधित निर्यात मालप्रेषाच्या खाती त्यांच्याकडे केलेल्या दाव्याच्या तडजोडीत इएक्सपीर्ओट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इडिया लि.(इसीजीसी) कडून प्राप्त झालेल्या निधीतून समायोजित कराव्या लागलेल्या नौप्रेषपश्चात क्रेडिटवर व्याज आकार्यात एकसमानता आणण्याची खात्री करण्यासाठी बँकानी खालील मार्ददर्शक तत्त्वे स्वीकारावीतः

(ए) काही देशाना निर्यातीच्या बाबतीत, खरेदीदारांनी स्थनिक प्रदान केलेले असातानाहि संबंधित देशाच्या सरकारद्वारे/मध्यवर्ती बँकिंग अधिकाऱ्यांद्वारे, त्यांच्या अधिदान शेषाच्या समस्येमुळे विदेशी चलनाचे प्रत्यावर्तन केलेले नसते त्यामुळे निर्यातदाराना निर्यातीच्या उत्पन्नायीच वसूली करणे शक्य होत नाही. अशा प्रकरणांत इसीजीसी निर्यातादारांना हस्तांतरणातील दिरंगाईसाठी संरक्षण पुरविते. जेथे इसीजीसी ने दावा मान्य केला आहे आणि हस्तांतरणातील दिरंगाईसाठी रकमाचे प्रदान केले आहे, नौप्रेषपश्चात अग्रिम नौप्रेषाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या वर थकित असले तरीहि बँकांनी नौप्रेषपश्चात "इसीएनओएस" ला लागू असलेले व्याज आकारावे. असे व्याज, इसीजीसी ९० टक्के/७५ टक्के पर्यंतचा दावा मान्य करते आणि बाकी १० टक्के/२५ टक्के निर्यातदाराला त्याच्या स्वतःच्या स्रोतातून आणावे लागतात ही वस्तुस्थिती विचारात न घेता, अग्रिमाच्या संपूर्ण रकमेवर लागू असेल.

(बी) ज्या प्रकरणात व्याज व्यावसायिक किंवा "इसीएनओएस" दराने आकारण्यात आले आहे, नंतर मान्यताप्राप्त पद्धतीने निर्यातीचे उत्पन्न वसूल झाले तर, बँक अशा वसूलीच्या समाधानकारक पुराव्याने वस्तुस्थितीची खात्री करून घेऊन, आधीच आकारण्यात आलेले व्याज आणि सदरहू वसूली विचारात घेऊन आकाराण्यायोग्य व्याज यातील फरकाएवढी रक्कम ऋणकोला परत करील. खात्यांचे समायोजन करताना अधिक व्याजाच्या परताव्याची संभाव्यता ऋणकोच्या नजरेला आणल्यास अधिक चांगले होईल.

**४.२.७ बिलाच्या टेनरमधील बदल**

१) आरबीआय (एफईडी) द्वारे बँकांना निर्यातदारांच्या विनंतीवर मूळ खरेदी करणा-याच्या/कन्साईनीच्या टेनरमध्ये बदल करण्याची अनुमती देण्यात आली आहे व त्यासाठीची अट अन्य गोष्टींसोबत रक्कम भरण्याचा सुधारित दिनांक निर्यात प्रोसीडस प्रत्यक्षात येण्यासाठी एफईडीद्वारे निर्धारित करण्यात आलेल्या अधिकतम कालावधीच्या पुढे जाऊ नये, ही आहे.

२) ज्या परिस्थितीमध्ये पाठवणीच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत टेनरमधील बदल केला जात असेल, अशा परिस्थितींमध्ये, आरबीआयद्वारे जारी करण्यात आलेल्या निर्देशांमधील व्याज दरांनुसार सुधारित आनुषांगिक ठरलेल्या दिनांकापर्यंत निर्धारित व्याज दरामध्ये वाढ करण्यास अनुमती आहे.

**४.३ रूपये निर्यात कर्जावरील व्याज दरांसाठी आर्थिक सहाय्य**

२००७ मध्ये, भारत सरकारने निर्यातीच्या पुढील विशिष्ट नऊ प्रकारांसाठी रूपये निर्यात कर्ज व्याज दरांवर प्रतिवर्षी २% अंकांनुसार आर्थिक सहाय्य देण्याची घोषणा केलीरू टेक्स्टाईल्स (हँडलूमसह), तयार कपडे, लेदर उत्पादने, हँडिक्राफ्टस, अभियांत्रिकी उत्पादने, प्रक्रिया केलेली कृषी उत्पादने, सागरी उत्पादने, क्रीडा साहित्य आणि खेळणे. हे सहाय्य एसएमई क्षेत्रातील सूक्ष्म, लहान आणि मध्यम उद्योजक अशा प्रकारात व्याख्या केल्या गेलेल्या सर्व निर्यातदारांना १ एप्रिल २००७ ते ३० सप्टेंबर २००८ पर्यंत मिळतील.

ह्याची व्याप्ती पुढे विस्तारित करण्यात आली व त्यामध्ये ज्युट आणि कारपेटस, प्रक्रिया केलेले काजू, कॉफी आणि चहा, सॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्टेड डिऑइल केले केक, प्लास्टिक आणि लिनोलियमचा समावेश करण्यात आला. तसेच, लेदर आणि लेदर उत्पादक व सागरी उत्पादनांच्या संदर्भात आधीच्या योजनेमध्ये

टेक्स्टाईल्सच्या अंतर्गत असलेल्या आरएमजी आणि कार्पेटसारख्या व मानवनिर्मित फायबर आणि हँडिक्राफ्टस वगळता सर्व प्रवर्गांना सरकारने २ टक्के (आधी देण्यात आलेल्या २ टक्क्यांच्या व्यतिरिक्त) सबव्हेन्शन प्रिशिपमेंट कर्ज १८० दिवसांसाठी आणि पोस्ट शिपमेंट कर्ज ९० दिवसांसाठी उपलध केले (कार्पेट क्षेत्रामध्ये प्रिशिपमेंट कर्ज २७० दिवस उपलध केले). त्यानुसार, बँका १ एप्रिल २००७ ते ३० सप्टेंबर २००८ च्या कालावधीत थकित रकमेवर बीपीएलआर वजा ४.५/६.५ टक्के लागू असेल त्याप्रमाणे ह्याहून अधिक व्याज दर १८० दिवसांपर्यंत प्रिशिपमेंट कर्जावर व ९० दिवसांपर्यंत पोस्ट शिपमेंट कर्जावर लावू शकणार नाहीत. तरीही, एकूण सबव्हेन्शन हे ह्या अटीवर अवलंबून असेल, की सबव्हेन्शननंतरचा व्याज दर ७ टक्केच्या - म्हणजेच जो दर प्रावन्य क्षेत्रातील कर्जपद्धतीमध्ये कृषी क्षेत्राला लागू आहे- खाली येऊ नये.

डिसेंबर २००८ मध्ये भारत सरकारने २ टक्के अंकाने सबव्हेन्शनची दुसरी योजना पुढील काही विशिष्ट रोजगार आवरित निर्यात क्षेत्रांसाठी १ डिसेंबर ते ३० सप्टेंबर २००९ ह्या कालावधीसाठी जाहीर केली. टेक्स्टाईल्स (हँडलूमसह), हँडिक्राफ्टस, कार्पेटस, लेदर, दाग-दागिने, सागरी उत्पादने आणि लघु आणि मधयम उद्योग. त्यानुसार, १ डिसेंबर २००८ ते ३० सप्टेंबर २००९ च्या कालावधीत थकित रकमेवर बीपीएलआर वजा ४.५ हून अधिक व्याज दर १८० दिवसांपर्यंत प्रिशिपमेंट कर्जावर व ९० दिवसांपर्यंत पोस्ट शिपमेंट कर्जावर लावू शकणार नाहीत. नंतर ही योजना ३१ मार्च २०१० पर्यंत विस्तारित करण्यात आली.
एप्रिल २०१० मध्ये भारत सरकारने काही रोजगार आवरित निर्यात क्षेत्रांसाठी २ टक्के अंक असलेली सबव्हेन्शनची योजना १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ ह्या कालावधीसाठी जाहीर केलीः हँडिक्राफ्टस, कार्पेटस, हँडलूम्स आणि लघु व मधयम उद्योग (एसएमई) व त्यामध्ये ही अट होती, की वरील कालावधीत थकित रकमेवर बीपीएलआर वजा ४.५ हून अधिक व्याज दर १८० दिवसांपर्यंत प्रिशिपमेंट कर्जावर व ९० दिवसांपर्यंत पोस्ट शिपमेंट कर्जावर लावणार नाहीत. तरीही, एकूण सबव्हेन्शन हे ह्या अटीवर अवलंबून असेल, की सबव्हेन्शननंतरचा व्याज दर ७ टक्केच्या -म्हणजेच जो दर प्रावन्य क्षेत्रातील कर्जपद्धतीमध्ये कृषी क्षेत्राला लागू आहे- खाली येऊ नये.
ऑगस्ट २०१० मध्ये भारत सरकारने रूपये निर्यात कर्जावर २% सबव्हेन्शन व्याज ला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आणि १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ पर्यंत त्याच अटी आणि शर्तींसह त्यात काही विशिष्ट अतिरिक्त क्षेत्रे समाविष्ट करण्यात आलीः लेदर आणि लेदर उत्पादक, ज्युट उत्पादक- ज्यामध्ये फ्लोअर कव्हरिंगचा समावेश होता, अभियांत्रिकी साहित्य आणि टेक्स्टाईल्स.
पाया दर प्रणालीच्या बदलापासून, रूपये निर्यात कर्जाच्या अग्रिम रकमांच्या सर्व टेनर्सना लागू असलेले व्याज दर १ जुलै २०१० पासून सर्व नवीन/ नूतनीकरण केलेल्या अग्रिम रकमांच्या संदर्भात पाया दर झाले आहेत व त्याची माहिती आमच्या ६ मे २०१० च्या परिपत्रकात दिली आहे. परिपत्रक डीबीओडी. डायर. (निर्यात)बीसी क्र. १०२/०४.०२.००१/२००९-१०. त्यानुसार, वर उल्लेखित क्षेत्रांमध्ये सबव्हेन्शनची रक्कम उपलध असल्यास बँकांनी निर्यातदारांना लावण्यात येणा-या व्याज दरांना कमी करून पाया दर प्रणालीचा अंगीकार करावा. जर त्याचा परिणाम म्हणून, निर्यातदारांना लावण्यात येणारा व्याज दर पाया दरापेक्षा कमी होत असेल, तर असे कर्ज पाया दर मार्गदर्शक नियमांचा भंग मानले जाणार नाही.

लागू असेल त्याप्रमाणे बँकांनी पात्र निर्यातदारांना व्याज सबव्हेन्शनचा सर्व लाभ उपलध करून देणे व बाह्य लेखापालाद्वारे प्रमाणित करण्यात आलेले दावे आरबीआयला रक्कम पुनरू मिळण्यासाठी (रिइम्बर्समेंट) सादर करणे आवश्यक आहे. बँकांनी सादर केलेल्या तिमाही दाव्यांच्या आवरे आरबीआयद्वारे सबव्हेन्शन रिइम्बर्स केले जाईल.

**भाग -बी**

## <u>विदेशी चलनात निर्यात क्रेडिट</u>

### ५.१ <u>विदेशी चलनात नौप्रेषपूर्व क्रेडिट (पीसीएफसी)</u>

५.१.१ <u>सर्वसाधारण</u>

आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक दराने निर्यातदाराना क्रेडिट उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, अधिकृत डिलर्सना निर्यातदाराना लिबॉर/युरो लिबॉर/युरीबॉर वर निर्यात मालाच्या स्थानिक आणि आयात निविष्टीसाठी खाली तपशीलवार दिलेल्या संबंधित व्याजाच्या दराने विदेशी चलनात नौप्रेषपूर्व क्रेडिट देण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

५.१.२ <u>योजना</u>

(१) ही योजना भारतीय निर्यातदाराना आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक दराने नौप्रेषपूर्व क्रेडिट पुरविण्यासाठी अतिरिक्त खिडकी आहे. ते केवळ रोख निर्यातीनाच लागू असेल. रुपया निर्यात क्रेडिटच्या संबंधातील सूचना योग्य त्या फेरफारांसह विदेशी चलनातील निर्यात क्रेडिटलाहि, अन्यथा विनर्दिष्टीत केल्या नसल्यास, लागू होतात.

(२) निर्यात वित्तपुरवठा प्राप्त करण्यासाठी निर्यातदाराला खालील पर्याय असतीलः

(ए) नौप्रेषपूर्व क्रेडिट रुपयां मध्ये प्राप्त करण्यासाठी आणि त्यानंतर नौप्रेषपश्चात क्रेडिट रुपयां मध्ये किंवा ईबीआर योजनेअंतर्गत परिच्छेद ६.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व्याज बिलांच्या सवलतीसाठी/ पुनर्सवलतीसाठी.

(बी) विदेशी चलनात नौप्रेषपूर्व क्रेडिट आणि इबीआर योजनेखाली विदेशी चलनात निर्यात बिलांचे डिस्काउंटिंग/रिडिस्काउंटिंग करणे.

(सी) रुपयात नौप्रेषपूर्व क्रेडिट प्राप्त करणे आणि नंतर बँकेच्या स्वेच्छानिर्णयाने काढलेली रक्कम पीसीएफसीत रुपांतरित करणे.

(३) चलनाची निवड

(ए) ही सुविधा कोणत्याहि एका परिवर्तनीय चलनात म्हणजेच यूएस डॉलर्स, पौंड स्टर्लिंग, जापनीज येन, युरो वगैरे. दिली जाईल

(बी) निर्यातदारांना प्रचालनीय लवचिकता असणे शक्य व्हावे म्हणून, अन्य परिवर्तनीय चलनात बीजक तयार केलेल्या निर्यात ऑर्डरसाठी दुसऱ्या परिवत्रनीय चलनात पीसीएफसी देणे बँकांसाठी उचित होईल.. उदाहरणार्थ, एखादा निर्यातदार युरो मध्ये बीजक तयार केलेल्या निर्यात ऑर्डरसमक्ष यूएस डॉलर मध्ये पीसीएफसी प्राप्त करू शकेल. विरुद्ध चलनातील व्यवहारांचा खर्च आणि जोखीम निर्यातदाराची असेल.

(सी) बँकाना एसीयू देशाना निर्यात करण्यासाठी पीसीएफसी देण्याची परवानगी आहे.

(डी) लागू असलेला फायदा निर्यातदाराला केवळ निर्यात बिलांच्या वसूलीनंतर किंवा परिणत निर्यात बिले ‘‘विदाऊट रिकोर्स’’ तत्त्वावर रिडिस्काउंट केली जातील तेव्हाच होईल.

५.१.३ <u>बँकांसाठी निधीचा स्रोत</u>

(१) एक्स्चेंज अर्नर्स फॉरिन करंसी(इइएफसी) खात्यात, रेसिडेंट फॉरिन करंसी(आरएफसी)(डी) खात्यात आणि फॉरिन करंसी (अनिवासी) खाते (बँका) योजनात बँकांकडे उपलब्ध असलेल्या विदेशी चलनातील शिल्लक रकमेचा, विदेशी चलनातील नौप्रेषपूर्व क्रेडिटला वित्तपुरवठा करण्यासाठी विनियोग करता येईल.

(२) एस्क्रो खाती आणि इएक्सपीर्टर्स फरिन करंसी खाती यांच्या अधीन उपलब्ध असलेल्या विदेशी चलनाचा सुद्धा या हेत्वर्थ विनयोग करण्यासाठी, खातेधारकांची निधीची गरज भागवली जाईल आणि विस्तृत सुविधेअधीन खात्यात कमाल शिल्लक ठेवण्याची विहीत मर्यादा न उल्लंघण्याच्या अटीच्या अधीन बँकाना परवानगी आहे.

(३) <u>विदेशी चलनातील ऋणे</u>

(ए) त्याशिवाय, बँका विदेशातून कर्ज घेण्याची व्यवस्था करू शकतात. आरबीआयच्या आधीच्या मान्यतेशिवाय निर्यातदारांना पीसीएफसी अनुदान देण्याच्या उद्देशाने विदेशी बँकांच्या क्रेडिटच्या धोरणाप्रमाणे बँका पुढील परिस्थितीमध्ये कृती करू शकतात, जेव्हा अशा कर्जावरील व्याज दर सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ लिबर/युरो लिबर युरिबर मधील १०० पाया अंकांपेक्षा अधिक नसेल.

(बी) बँकानी व्यवस्था केलेल्या लाइन ऑफ क्रेडिटवर केवळ त्यानी निर्यातदाराना पीसीएफसीखाली मंजूर केलेल्या कर्जाच्या मर्यादेपर्यंतच रक्कम काढावी. तथापि, जेथे लाइन ऑफ क्रेडिट उपलब्ध करून देणारी समुद्रपार बँक काढण्याची किमान रक्कम ठरवून देते, जी खूप मोठी नसावी, विनियोग न केलेला छोटा हिस्सा बँकेने तिच्या विदेशी चलनाच्या स्थितीत आणि ॲग्रीगेट गॅप लिमिट(एजीएल)मध्ये बसवावा. त्याचप्रमाणे, निर्यातदाराकडून कोणतेहि पूर्वप्रदानसुद्धा विदेशी चलनाच्या स्थितीत आणि एजीएलच्या मर्यादेत घ्यावे.

(सी) बँका, स्वतः विदेशातून कर्ज उभारण्याच्या स्थितीत नसतील तर भारतातील अन्य बँकांकडून, बँकेची विदेशात शाखा नसेल तर निर्यातदाराला अंतिम खर्च लिबॉर/युरो लिबॉर/युरीबॉरच्या वर २०० बेसिस पॉइंटस बाहेर पडता कामा नये या अटीच्या अधीन लाइन्स ऑफ क्रेडिट प्राप्त करू शकतात. ऋणको आणि कर्जदार बँक यांच्यातील विस्तार संबंधित बँकेच्या स्वेच्छानिर्णयावर सोडण्यात आला आहे.

(४) आयात निविष्टीच्या प्रापणासाठी निर्यातदाराने सप्लायर्स क्रेडिटची व्यवस्था केली असेल तर, बँकानी पीसीएफसी सुविधा केवळ निर्यातीसाठी स्थानिक निविष्टीला वित्तपुरवटा करण्यासाठी द्यावी.

(५) अधिसूचना क्र. एफइएमए.३/२००० आरबी दिनांकित मे ३, २००० च्या परिच्छेद ४.२(१) नुसार कर्जाऊ घेतलेला निधी वापरण्याची त्याचप्रमाणे आरबीआय(एफइडी)ने मंजूर केलेल्या ॲग्रीगेट गॅप लिमिट(एजीएल) च्या पालनाअधीन विदेशी चलनात नौप्रेषपूर्व क्रेडिट(पीसीएफसी) मंजूर करण्यासाठी स्थानिक विदेशी चलन बाजारात खरेदी/विक्रीच्या देवाणघेवाणीतून निर्माण केलेला विदेशी चलनातील निधीसुद्धा वापरण्याची बँकाना परवानगी आहे.

५.१.४ <u>विस्तार</u>

(१) विदेशी चलनातील नौप्रेषपूर्व क्रेडिटचा विस्तार लिबॉर/युरो लिबॉर/युरीबॉर(६ महिने) अशा आंतरराष्ट्रीय संदर्भ दरांशी निगडित असेल.

(२) निर्यातदाराला कर्ज देण्याचा दर विथहोल्डिंग कर वगळता लिबॉर/युरो लिबॉर/युरीबॉरच्या वर २०० बेसिस पॉइंटस अधिक नसावा.

(३) लिबॉर/युरो लिबॉर/युरीबॉर दर साधारणपणे १, २, ३, ६ आणि १२ महिन्यांच्या प्रमाणित कालावधीसाठी उपलब्ध असतात. पीसीएफसी ६ महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी हवी असेल तर बँका प्रमाणित कालावधीच्या आधारे दर देऊ शकतात. तथापि, अप्रमाणित कालावधीसाठी दर देताना, बँकानी खात्री करावी कि दिलेला दर पुढच्या वरच्या प्रमाणित कालावधीपेक्षा खाली असेल.

(४) पीसीएफसी जर परिसमापित करण्यात आली तर बँका पीसीएफसीवर विदेशी चलनाच्या विक्रीसमक्ष किंवा इइएफसी खात्यातील शिलकीतून किंवा निर्यात बिलांच्या डिस्काउंटेड मूल्यातून मासिक अंतराने व्यज गोळा करू शकतात.

५.१.५ <u>क्रेडिटचा कालावधी</u>

(१) पीसीएफसी कमाल ३६० दिवसांच्या कालावधीसाठी उपलब्ध असेल. क्रेडिटची कोणतीहि मुदतवाढ रुपया पॅकिंग क्रेडिटच्या वाढीव मुदतीसाठी लागू असलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन असेल आणि

आरंभीच्या १८० दिवसांच्या कालावधीसाठी मुदतवाढीच्या वेळेस असलेल्या दराने त्यावर २०० बेसिस पॉइंटस अतिरिक्त व्याजाचा खर्चसुद्धा असेल.

(२) त्यापुढील मुदतवाढ संबंधित बँकेने निश्चीत केलेल्या अटी आणि शर्तीच्या अधीन असेल आणि ३६० दिवसांच्या आत निर्यात करण्यात आली नाही तर, पीसीएफसी संबंधित चलनाच्या टी.टी. विक्री दरासमक्ष समायोजित केली जाईल. अशा प्रकरणात आरबीआयच्या पूर्वनुमतिविना बँका विदेशात उभारलेल्या लाइन ऑफ क्रेडिट किंवा कर्जाच्या आणि व्याजाच्या परतफेडीसाठी विदेशी चलनाच्या वित्तप्रेषणाची व्यवस्था करू शकतात.

(३) १८० दिवसांमधील पीसीएफसीच्या विस्तारासाठी, बँकांना वाढीव कालावधीसाठी लागू असलेल्या लिबर/युरो लिअर/युरिबर दरानुसार मुद्दल रकमेच्या आधारे स्थिर रोलमध्ये वाढ करण्याची व लिबर/युरो लिबर/युरिबर वरील २०० पाया अंकांच्या (१८ फेब्रुवारी, २०१० पर्यंत ३५० मूलभूत अंक) अनुमती असलेल्या मर्यादेपलीकडे अनुमती बँकांना आहे.

५.१.६ <u>पीसीएफसीचे वाटप</u>

(१) स्थानिक निविष्टीला वित्तपुरवठ्यासाठी पीसीएफसीच्या पूर्ण रकमेचा किंवा तिच्या काही भागाचा विनियोग केल्यास, बँका व्यवहारासाठी उचित स्पॉट दर लागू करू शकतात.

(२) व्यवहारंच्या किमान गटांच्या बाबतीत, त्यांचे स्वतःचे स्रोत विचारात घेऊन किमान गट ठरविणे बँकांच्या प्रचालनीय सोयीवर सोडण्यात आले आहे. तथापि, गट निश्चीत करताना बँकाना त्यांच्या छोट्या गुंतवणूकदारांच्या गरजाहि विचारात घेता येतील.

(३) बँकानी त्यांची कार्यपद्धती आखीव करण्यासाठी पावले उचलावीत जेणेकरून एकदा पॅकिंग क्रेडिट लिमिट अधिकृत करण्यात आल्यानंतर पीसीएफसीसाठी वेगळ्या मंजूरीची गरज असणार नाही आणि शाखांमधून वाटपात दिरंगाई होणार नाही.

५.१.७ <u>पीसीएफसी खात्याचे परिसमापन</u>

(१) <u>सर्वसाधारण</u>

परिच्छेद ६.१ मध्ये तपशीलवार दिलेल्या इबीआर योजनेखाली निर्यात कागदपत्रे डिस्काउंटिंग/रिडिस्काउंटिंगसाठी सादर केल्यानंतर निर्यातीच्या उत्पन्नातून किंवा विदेशी चलनातील कर्जांच्या(डीपी बिल्स) मंजूरीद्वारे पीसीएफसी चे परिसमापन करता येईल. निर्यातदार आणि बँक यांच्यातील परस्पर सामंजस्यानेहि त्याचे इइएफसी खात्यातील शिलकीतून त्याचप्रमाणे निर्यातदाराच्या रुपया स्रोतातूनहि प्रत्यक्ष केलेल्या निर्यातीच्या प्रमाणात परिसमापन करता येईल.

(२) <u>एफ.ओ.बी.च्या मूल्यापेक्षा अधिक असलेले पॅकिंग क्रेडिट</u>

काही प्रकरणात, (म्हणजे एचपीएस शेंगदाणा, डिफॅटेड आणि डिऑइल्ड केक्स, तंबाखू, मिरी, वेलची, काजूगर, वगैरे) जेथे आवश्यक असलेले पॅकिंग क्रेडिट एफओबी मूस्यापेक्षा अधिक असते, पीसीएफसी केवळ उत्पादनाच्या निर्यातयोग्य भागासाठी उपलब्ध असेल.

(३) <u>ऑर्डर/वस्तूतील बदल</u>

**निर्यातदाराने निर्यात केलेल्या त्याच किंवा अन्य वस्तूंचा समावेश असलेल्या कोणत्याहि अन्य ऑर्डरच्या संबंधातील कागदपत्रांनी किंवा इइएफसी खात्यातील शिलकीतून** पीसीएफसीची परतफेड-परिसमापन होऊ शकते. अशा प्रकारे कंत्राटातील बदलाला परवानगी देताना, बँकानी तो व्यावसायिक दृष्ट्या आवश्यक आणि अनिवार्य असल्याची खात्री करून घ्यावी. विशिष्ट वस्तूच्या नौप्रेषासाठी दिलेली फीसीएफसी सामान्य पद्धतीने परिसमापित का केली जाऊ शकत नाही याच्या वैध कारणांबाबतहि बँकानी समाधान करून घ्यावे. शक्यतोवर, कंत्राटातील बदलाला निर्यातदाराने त्याच बँकेत खाते ठेवले असल्यास किंवा त्याला संघाच्या सदस्यांची, एखादा असल्यास, मान्यता असेल तरच परवानगी द्यावी.

५.१.८ निर्यात ऑर्डर रद्द करणे/कार्यवाही न करणे

(१) निर्यातदाराने बँकेकडून ज्या निर्यात ऑर्डरसाठी पीसीएफसी प्राप्त केली आहे ती रद्द झाल्याच्या प्रकरणात किंवा कोणत्याहि कारणाने निर्यातदार निर्यात ऑर्डरची कार्यवाही करू शकत नसल्यास, निर्यातदाराने बँकेमार्फत स्थानिक बाजारातून विदेशी चलन(मुद्दल+व्याज) खरेदी करून कर्जाची त्यावर लागू झालेल्या व्याजासह परतफेड करणे योग्य ठरेल. अशा प्रकरणात, नौप्रेषपूर्व टप्प्यावर इसीएनओएसला लागू असलेला दर अधिक अग्रिमाच्या तारखेपासून दंडनीय व्याज, पीसीएफसीवरील आधीच वसूल केलेल्या व्याजाच्या समायोजनानंतर, मुदलाच्या रकमेच्या सममूल्य रुपयांवर देय असेल.
(२) समुद्रपार बँकेकडून प्राप्त केलेल्या लाइन ऑफ क्रेडिटमधून जर निर्यातदाराला पीसीएफसी उपलब्ध करून दिली असेल तर, बँकानी त्या समुद्रपार बँकेला रकमेचे वित्तप्रेषण करणे योग्य ठरेल.
(३) बँका नंतर, आधीचे पीसीएफसी रद्द करणे प्रामाणिक कारणासाठी याची खात्री करून घेतल्यावर, अशा निर्यातदाराना पीसीएफसी देऊ शकतात.

५.१.९ सर्व वस्तूंसाठी ‘रनिंग अकाउंट’ सुविधा

(१) रुपया क्रेडिटअधीन उपलब्ध असलेल्या सुविधेच्या धर्तीवर, खाली अटींच्या अधीन, बँकानी निर्यातदाराना सर्व वस्तूंसाठी पीसीएफसी योजनेखाली ‘रनिंग अकाउंट’ सुविधा देण्यासाठी परवानगी आहेः

(ए) ‘रनिंग अकाउंट’ सुविधेची गरज निर्यातदाराने बँकेचे समाधान होईल अशा प्रकारे स्थापित केली असल्यास बँका ती देऊ शकतील.

(बी) बँकानी ही सुविधा फक्त अशाच निर्यातदाराना द्यावी ज्यांचा पूर्वेतिहास चांगला आहे.

(सी) जेथे नौप्रेषपूर्व क्रेडिट ‘रनिंग अकाउंट’ सुविधा देण्यात आली आहे अशा सर्व प्रकरणात, पतपत्रे किंवा निश्चीत ऑर्डर्स उचित कालावधीत हजर कराव्यात.

(डी) पीसीएफसी ‘पहिला-आत-पहिला-बाहेर’ तत्त्वावर मार्क ऑफ केली जाईल.

(इ) ज्या निर्यात कागदपत्रांच्या उत्पन्नासमक्ष निर्यातदाराने पीसीएफसी काढलेली नाही त्यानीहि पीसीएफसी मार्क ऑफ करता येईल.

(२) बँकानी निश्चीत ऑर्डर हजर करण्याचे आणि निधीच्या अंतिम उपयोगाचे सुध्दा बारीकपणे संनियंत्रण करावे. तिने खात्री केली पाहिजे कि स्थानिक उपयोगासाठी निधी फिरवलेला नाही. पीसीएफसीतून काढलेल्या रकमेचा निर्यातीच्या हेतूने विनयोग न केल्यास, उक्त प्रतिपादित दंडनीय तरतूदी लागू कराव्यात आणि संबंधित निर्यातदाराची ‘रनिंग अकाउंट’ सुविधा काढून घ्यावी.

(३) बँकानी पीसीएफसी खालील निर्यातदारांकडील कोणतेहि पूर्वप्रदान उक्त परिच्छेद ५.१.३ (३) (बी) मध्ये दर्शविल्याप्रमाणे त्यांच्या विदेशी चलनाच्या स्थितीच्या आणि ॲग्रीगेट गॅप लिमिटच्या आत घेतले पाहिजे. ‘रनिंग अकाउंट’ सुविधा देण्यामुळे दीर्घकालाने अनुरुपता उद्‌भवण्याचा संभव असते ज्याचा खर्च बँकेवर पडतो. एक महिन्याच्या कालावधीच्या बाहेर पूर्वप्रदानाच्या बाबतीत अनुरुपता शोषून घेण्यासाठी येणारा काही खर्च असल्यास, बँका निर्यातदाराना निधी पुरवठा खर्च आकारू शकतात.

५.१.१० हवाला कंत्राटे

(१) उक्त परिच्छेद ५.१.२ (३) नुसार, अन्य परिवर्तनीय चलनात बीजक तयार केलेल्या पीसीएफसी निर्यात ऑर्डरच्या बाबतीत कोणत्याहि परिवर्तनीय चलनात पीसीएफसी देता येईल. पीसीएफसी प्राप्त करण्यापूर्वी निश्चीत ऑर्डरच्या आधारावर हवाला कंत्राट बुक करण्यासाठी आणि पीसीएफसी प्राप्त केल्यानंतर त्यावेळच्या बाजारातील किंमतीवर कंत्राट रद्द करण्यासाठी(आयात निविष्टीसाठी वापरलेल्या काढलेल्या रकमेच्या भागासाठी) निर्यातदाराना परवानगी देण्यासाठी बँकाना अनुमति आहे.
(२) बाजारात सक्रियपणे व्यवहार केल्या जाणाऱ्या, त्यांच्या पसंतीच्या कोणत्याहि अनुज्ञेय चलनात संरक्षण मिळविण्यासाठी ग्राहकाना परवानगी देण्याची बँकाना, त्या व्यवहारातील अनुज्ञेय चलनातील चलनाच्या जोखमी ग्राहकासमोर येतील याची खात्री करण्याच्या अधीन, अनुमति आहे.

(३) योजनेखाली हवाला कंत्राटाना परवानगी देताना, बँकानी निर्यात वित्तपुरवठ्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावरील व्यवहारातील चलनाच्या जोखमी ग्राहकाच्या समोर येतील या विनिमय नियंत्रणाच्या मूलभूत गरजेची पूर्तता करण्याची खात्री करून घ्यावी.

५.१.११ <u>पीसीएफसी खालील इपीसी वाटून घेणे</u>

(१) रुपया पॅकिंग क्रेडिट निर्यात ऑर्डर धारक आणि निर्यात करायच्या मालाचा उत्पादक यांच्या त वाटून घेण्यास अनुमति आहे. तसेच, बँका त्या बँकेतील निर्यात आदेश धारकाच्या डिसक्लेमरच्या आधारे उत्पादकांनासुद्धा पीसीएफसी वाढवून देऊ शकतात.

२. उत्पादकांना देण्यात आलेले पीसीएफसी निर्यात आदेश धारकाकडून परकीय चलनातील हस्तांतरणाद्वारे पीसीएफसी वापरून किंवा बिलांवरील सवालतीद्वारे परत केले जाऊ शकतात. ह्या व्यवहारामध्ये कोणताही दुहेरी आर्थिक व्यवहार समाविष्ट नाही, ह्याची खात्री बँकांनी करावी आणि पत पॅक करण्याचा एकूण कालावधी सामग्री निर्यात करण्याच्या निर्मितीच्या प्रत्यक्ष साखळीइतका मर्यादित असेल.

(३) ही सुविधा जेथे बँकर किंवा बँकांच्या संघाचा नेता निर्यात ऑर्डर धारक किंवा उत्पादकासाठी एकच आहे, किंवा जेथे निर्यात ऑर्डर धारक आणि उत्पादक यांचे बँकर वेगळे आहेत तेथे संबंधित बँक अशा व्यवस्थेला मान्यता देत असेल तर देण्यात यावी. निर्यातीच्या फायद्याची विभागणी निर्यात ऑर्डर धारक आणि उत्पादक यांच्यातील परस्पर सामंजस्यावर सोडण्यात आली आहे.

५.१.१२ <u>एका इओयू/इपीझेड/एसइझेड युनीटकडून दुसऱ्या इओयू/इपीझेड/एसइझेड युनीटला पुरवठा</u>

१. पीसीएफसी पुरवठादार ईओयु/ईपीझेड/एसईझेड युनिट आणि ग्राहक ईओयु/ईपीझेड/एसईझेड ह्या दोघांना उपलब्ध राहील.

(२) पुरवठादार इओयू/इपीझेड/एसइझेड युनीट साठी पीसीएफसी मालाच्या कच्च्या सामग्रीसाठी/घटकांसाठी असेल जी त्यानंतर प्रोसे केली जाईल आणि शेवटी प्राप्तकर्त्या इओयू/इपीझेड/एसइझेड युनीटला निर्यात केली जाईल.

(३) पुरवठादार इओयू/इपीझेड/एसइझेड युनीटला दिलेली पीसीएफसी प्राप्तकर्त्या इओयू/इपीझेड/एसइझेड युनीटकडील विदेशी चलनातून परिसमापित केली पाहिजे, ज्यासाठी प्राप्तकर्ता इओयू/इपीझेड/एसइझेड युनीट पीसीएफसी प्राप्त करू शकते.

(४) विदेशी चलनातील प्रदानाद्वारे पीसीएफसीच्या परिसमापनाच्या बाबतीतील नियमाची पूर्तता अशा प्रकरणात निर्यात कागदपत्रांच्या वाटाघाटीद्वारे न करता प्राप्तकर्ता इओयू/इपीझेड/एसइझेड युनीटच्या बँकरद्वारे पुरवठादार इओयू/इपीझेड/एसइझेड युनीटच्या बँकरला हस्तांतरणाद्वारे करावी. अशा प्रकारे, पुरवठादार इओयू/इपीझेड/एसइझेड युनीटच्या दृष्टीने साधारणपणे व्यवहारात कोणतेहि नौप्रेषपश्चात क्रेडिट नसेल.

(५) अशा सर्व प्रकरणात, बँकानी याची खात्री करून घेतली पाहिजे कि एकाच व्यवहारासाठी दुहेरी वित्तपुरवठा केला जात नाही. प्राप्तकर्ता इओयू/इपीझेड/एसइझेड युनीटची पीसीएफसी निर्यात बिलांच्या डिस्काउंटिंगद्वारे परिसमापित केली जाईल हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

५.१.१३ <u>मानीव निर्यात</u>

केवळ बहुपक्षीय-द्विपक्षीय एजन्सीज-निधी यांच्याद्वारे वित्तपुरवठा केल्या जाणाऱ्या प्रकल्पाना पुरवठा करण्यासाठी ।मानीव निर्याती। साठी पीसएफसीला परवानगी दिली जाईल. ।मानीव निर्याती। साठी मंजूर केलेल्या पीसीएफसीचे परिसमापन पुरवठापश्चात टप्प्यावर, पासून कमाल ३० दिवसांच्या कालावधीसाठी

किंवा प्रकल्प अधिकाऱ्यांकडून प्रदान प्राप्त झाल्याच्या तारखेपर्यंत, यापैकी जे आधी असेल, विदेशी चलनात कर्ज मंजूर करून करावे. पीसीएफसीची परतफेड/पूर्वप्रदान इइएफसीतील शिलकीतून किंवा निर्यातदाराच्या रुपया स्रोतातून सुद्धा प्रत्यक्ष पुरवठा केल्याच्या मर्यादेपर्यंत करता येईल.

५.१.१४ पुनर्वित्तपुरवठा

पीसाएफसी योजनाखालील कोणत्याहि निर्यात क्रेडिटसमक्ष बँका आरबीआयकडून पुनर्वित्तपुरवठ्याला पात्र असणार नाहीत, आणि म्हणून, निर्यात क्रेडिट पुनर्वित्तपुरवठा काढण्याच्या हेतूने कळविलेल्या क्रेडिटच्या आकड्यांपासून पीसीएफसीची राशी वेगळी दाखवावी.

५.१.१५ अन्य मत्ता

(१) निर्यातदाराना इइएफसी खात्यात वगैरे निर्यात उत्पन्नाची पात्र टक्केवारी जमा होण्यासारखे लागू असणारे लाभ निर्यात बिलांच्या वसूलीनंतरच उपार्जित होतील आणि नौप्रेषपूर्व क्रेडिटचे नौप्रेषपश्चात क्रेडिटमध्ये रुपांतर करण्याच्या टप्प्यावर नाही(।विदाऊट रिकोर्स। बिले डिस्काउंट /रिडिस्काउंट केल्याचा अपवाद).
(२) संबंधित निर्यात वित्तपुरवठा समायोजित केल्यानंतर उपलब्ध असलेला निर्यात उत्पन्नाचा अधिकांश आणि इइएफसी खात्यातील जमा, आयात बिले चुकती करण्यासाठी परवानगी देऊ नये.
(३) इसीजीसी संरक्षण केवळ रुपयातच उपलब्ध असेल तर, पीसीएफसी विदेशी चलनात.
(४) निर्यात क्रेडिट देण्याबाबतची बँकांच्या कामगिरीचा अंजदाज घेण्यासाठी, पीसीएफसीची रुपयातील सममूल्यता विचारात घेतली जाईल.

## ५.२ **डायमंड डॉलर अकाउंट(डीडीए) योजना**

परकीय व्यापार धोरण २००९-२०१४ नुसार कच्च्या किंवा कटाई केलेल्या आणि पॉलिश केलेल्या हि-याच्या, हिरेजडीत अलंकारांच्या खरेदी/विक्रीमधील संस्था/ कंपन्यांची जर कमीत कमी दोन वर्षांसाठी हि-याच्या आयातीमध्ये किंवा निर्यातीमध्ये चांगली पार्श्वभूमी असेल व गेल्या तीन लायसन्स असतानाच्या वर्षांमध्ये (एप्रिल ते मार्च) त्यांची वार्षिक सरासरी उलाढाल रूपये ३ कोटी किंवा अधिक असेल, तर त्यांना ठरवण्यात आलेल्या डायमंड डॉलर खात्यांमधून (डीडीएज) त्यांचे व्यवसाय करण्यास अनुमती असेल.

डीडीए योजनेअंतर्गत, एका डीडीए धारकाद्वारे कच्च्या, कटाई केलेल्या आणि पॉलिश केलेल्या हि-यांच्या दुस-या डीडीए धारकाला केलेल्या विक्रीद्वारे प्राप्त केलेल्या पीसीएफसीला तरल करण्याची अनुमती बँकेस असेल. (डायमंड डॉलर खात्यांसंदर्भात अधिक माहितीसाठी, बँका ह्या आरबीआयच्या परकीय विनिमय विभागाद्वारे जारी करण्यात आलेल्या एपी (डीआयआर शृंखला) परिपत्रक क्र. १३ दिनांक २९ ऑक्टोबर, २००९ परिपत्रकाचा संदर्भ घेऊ शकतात).

## ६. **विदेशी चलनातील नौप्रेषपश्चात क्रेडिट**

### ६.१ विदेशात निर्यात बिलांच्या रिडिस्काउंटिंगची योजना (इबीआर)

६.१.१ सर्वसाधारण

बँका त्यांच्याकडील एक्स्चेंज अर्नर्स फॉरिन करंसी खाती(इइएफसी), रेसिडेंट फॉरिन करंसी खाती (आरएफसी), फॉरिन करंसी(अनिवासी) खाती(बँक्स) योजना, यात उपलब्ध असलेल्या विदेशी चलनाच्या स्रोतांचा विनियोग उपयोग बिले डिस्काउंट करण्यासाठी करू शकतात आणि ती रिडिस्काउंटिंग न करता त्योच्या पोर्टफोलिओत ठेवून घेऊ शकतात. विदेशातील निर्यात बिले नौप्रेषपश्चात टप्प्यावरील आंतरराष्ट्रीय व्याज दराशी निगडीत दरावर रिडिस्काउंट करण्याची बँकाना परवानगी आहे.

६.१.२ योजना

(१)  बिल्स पोर्टफोलिओ (सर्व पात्र बिलाचा समावेश असलेल्या) समक्ष सुविधा मिळविण्याच्या तुलनेत विदेशात बिलानुसार तत्त्वावर रिडिस्काउंटिंग सुविधा मिळविणे अधिक सोपे असेल. तथापि, एखाद्या विशिष्ट निर्यातदारासाठी, विशेषतः मोठ्या रकमेच्या व्यवहारासाठी, बँकेने बिलानुसार तत्त्वावर रिडिस्काउंटिंग सुविधा उपलब्ध केली तर त्याला मनाई असणार नाही.
(२) बँका कोणत्याहि मार्जिनविना आणि सांपार्श्विक कागदपत्रांद्वारे योग्य प्रकारे संरक्षित निर्यात बिलांच्या रिडिस्काउंटींग साठी ''बँकर्स एक्सेप्टन्स फॅसिलिटी'' (बीएएफ) व्यवस्था करू शकतील.
(३) प्रत्येक बँकेची समुद्रपार बँकेबरोबर किंवा रिडिस्काउंटीग एजन्सीबरोबर आपली स्वतःची बीएएफ मर्यादा निश्चित केलेली असू शकते किंवा फॅक्टरिंग एजन्सीसारख्या (फॅक्टरिंग व्यवस्थेच्या बाबतीत ती केवळ 'विदाऊट कोर्स' असावी) कोणत्याही अन्य एजन्सीबरोबर व्यवस्था असू शकते.
(४) निर्यातदार, एखाद्या समुद्रपार बँकेबरोबर किंवा अन्य कोणत्याहि एजन्सीबरोबर (फॅक्टरिंग एजन्सीसह), त्यांच्या निर्यात बिलांच्या थेट डिस्काउंटिंग साठी, त्यांची स्वतःची लाइन ऑफ क्रेडिटची व्यवस्था खालील अटींच्या अधीन करू शकतातः
(अ) निर्यातदार, समुद्रपार बँकेबरोबर आणि/किंवा अन्य एजन्सीबरोबर थेट बिल डिस्काउंटिंग केवळ त्याने या हेतूने निर्धारित केलेला बँकेमार्फतच करू शकतो.
(ब) निर्यात बिलांचे डिस्काउंटिंग ज्या बँकेकडुन पॅकिंग क्रेडिट सुविधा प्राप्त केली आहे त्या बँकेमार्फतच मार्गस्थ करता येईल. जर ते दुसऱ्या कोणत्याही बँकेमार्फत मार्गस्थ करण्यात आले तर नंतरचा संबंधित बँकेकडील थकित रकमेच्या समायोजनासाठी रिडिस्काउंटेड बिलांच्या उत्पन्नातून आधी व्यवस्था करील.
(५) समुद्रपार बँकानी/डिस्काउंटिंग एजन्सीजनी बँकांसाठी बीएएफखाली मंजुर केलेली मर्यादा आरबीआय(एफइडी)ने त्यांच्या साठी निश्चित केलेल्या कर्जाऊ रकमेसाठी मान्य केली जाणार नाही.

६.१.३ <u>पात्रतेचे निकष</u>

(१) योजना मुख्यत्वे, नौप्रेषाच्या तारखेपासून १८० दिवसांच्या कालावधीपर्यंत (सामान्य वाटचाल कालावधी किंवा काही असल्यास वाढीव कालावधी यासह) उपयोग करण्याच्या निर्यात बिलांसाठी आहे. तथापि, समुद्रपार संस्थांची हरकत नसेल तर, त्यात डिमांड बिलांच्या समावेशालाही मनाई नाही.

(२) जर ऋणको एफइडीच्या अस्तित्वातील सूचनांनुसार १८० दिवसांच्या वरील कालावधीसाठी उपयोग बिले काढण्यास पात्र असेल, इबीआर खालील नौप्रेषपश्चात क्रेडिट १८० दिवसांपेक्षा अधिक काळासाठी देता येईल.

(३) रिडिस्काउंटिंग योजनेखालील सुविधा कोणत्याहि परिवर्तनीय चलनात उपलब्ध असेल.

(४) एसीयु देशात निर्यातीसाठी इबीआर सुविधा देण्यास बँकाना अनुमति आहे.

(५) प्रचालनीय सोयीसाठी, बीएफए योजना बँकेने निर्धारित केलेल्या शाखेत केंद्रीभूत करता येईल. तथापि, बँकेच्या अन्य शाखाना त्यांच्या अतर्गत मार्गदर्शक तत्त्वानुसार/सूचनांनुसार योजनेचे प्रचालन करण्यास कोणतीहि मनाई नाही.

६.१.४ <u>ऑनशोअर निधीचा स्रोत</u>

(१) डिमांड बिलांच्या बाबतीत (उक्त परिच्छेद २.२.३ (१) मध्ये जे प्रतिपादित केलेले आहे त्याच्या अधीन) ती विद्यमान नौप्रेष (शिपमेंट)-पश्चात क्रेडित सुविधेमार्फत किंवा योजनेच्या आयबीआयडी मध्ये बँकांकडे उपलब्ध असलेल्या विदेशी चलनातील शिलकीतून निर्यातदाराना विदेशी चलनात कर्ज देण्याच्या मार्गाने मार्गस्थ करावी लागतील.
(२) निर्यात बिलांच्या रिडिस्काउंटिंगसाठी स्थनिक बाजाराच्या वाढीला वाव देण्यासाठी, सक्रिय आंतर-बँक मार्केटचे आस्थापन आणि विकास होणे इष्ट आहे. हे शक्य आहे कि, बँका डिस्काउंटिंग न करता त्यांच्या स्वतःच्या पोर्टफोलिओमध्ये बिले धारण करतील. तथापि, गरज असेल तर, बँकांचा स्थानिक बाजारात शिरकाव असला पाहिजे, ज्यामुळे देशाला रिडिस्काउंटिंगच्या किंमतीएवढे विदेशी चलन वाचविणे शक्य

होईल. त्याशिवाय, वेगवेगळ्या बँकांचे वेगवेगळ्या रकमांसाठी बीएएफ असल्यास, ज्या बँकेकडे तिच्या मर्यादेत शिल्लक उपलब्ध आहे ती दुसऱ्या मर्यादा संपलेल्या बँकेला किंवा अशा सुविधेची व्यवस्था न करू शकलेल्या बँकेला रिडिस्काउंटिंगची सुविधा देऊ शकते.

(३) बँका स्वतः जर विदेशातून कर्जे उभे करण्याच्या स्थितीत नसतील किंवा त्यांची विदेशात शाखा नसेल तर, निर्यातदाराला येणारा अंतिम खर्च विथहोल्डिंग कर वगळून लिबॉर/युरो लिबॉर/युरीबॉर च्या २०० बेसिस पॉइंटस वर जाता कामा नये या अटीच्या अधीन त्या भारतातील कोणत्याहि अन्य बँकेकडून क्रेडिट मार्ग उपलब्ध करू शकतात. कर्ज देणाऱ्या आणि कर्ज घेणाऱ्या बँकांमधील विभागणी संबंधित बँकांच्या स्व-निर्णयावर सोपविण्यात आला आहे.

(४) बँकाना अधिसूचना क्र. एफइएमए.३/२००० आरबी दिनांकित मे ३, २००० च्या परिच्छेद ४.२(१) च्या अटीनुसार कर्जाऊ घेतलेला विदेशी चलनातील निधी त्याचप्रमाणे आरबीआय(एफइडी)ने मंजुर केलेल्या अग्रिगेट गॅप लिमीटचे पालन करण्याअधीन इएक्सपीोर्ट बील्स ॲब्रॉड (इबीआर) ची सुविधा मंजुर करण्यासाठी स्थानिक विदेशी चलन बाजारात खरेदी-विक्री अदलाबदलीद्वारे निर्माण मिळविलेले विदेशी चलन वापरण्याची परवानगी आहे.

६.१.५ <u>'विथ रिकोर्स' आणि 'विदाऊट रिकोर्स' रिडिस्काउंटिंगची सुविधा</u>

हे मान्य करण्यात आले आहे कि, बीएएफ किंवा अन्य कोणत्याहि सुविधेखाली विदेशातून 'विदाऊट रिकोर्स' सुविधा प्राप्त करणे कठिण आहे. त्यामुळे, बिले 'विथ रिकोर्स' डिस्काउंट करता येतील. तथापि, एडी जर स्पर्धात्मक अटींवर 'विदाऊट रिकोर्स' सुविधेची व्यवस्था कर्ण्याच्या स्थितीत असेल तर, त्याला स्वतःसाठी अशी सुविधा प्राप्त करण्यासाठी अनुमति आहे.

६.१.६ <u>हिशोबाचे पैलू</u>

(१) निर्यात बिलाच्या डिस्काउंटेड मूल्याचे रुपयातील सममूल्य निर्यातदाराला देय असेल आणि त्याचा उपयोग थकित निर्यात पॅकिंग क्रेडिटची फेड करण्यासाठी करावा.

(२) बिलांचे डिस्काउंटिंग/विदेशी चलनातील कर्ज (डीपी बील्स) प्रत्यक्ष विदेशी चलनात असेल त्यामुळे बँका व्यवहारासाठी उचित स्पॉट दर लागू करू शकतात.

(३) डिस्काउंटेड रक्कमेचे रुपयातील सममूल्य/विदेशी चलनातील कर्ज बँकेच्या पुस्तकात विद्यमान नौप्रेष (शिपमेंट)पश्चात क्रेडिट हिशोबापासून संपूर्णपणे वेगळे दाखविण्यात यावेत.

(४) थकित बिलांच्या बाबतीत बँका थकित असल्याच्या तारखेपासून स्फटिकीकरणाच्या तारखेपर्यंत विदेशी चलनाच्या डिस्काउंटिंगच्या दराच्या वर २०० बेसिस पॉइंटस आकार लावू शकतात.

(५) स्फटिकीकरणाच्या तारखेपासून रुपयातील नौप्रेषपश्चात क्रेडिटसाठी आरबीआयच्या व्याज दराच्या बाबतीतील आदेशानुसार व्याज दर लागू असेल.

(६) निर्यात बिलाचे प्रदान न झाल्याच्या प्रसंगात, आरबीआयच्या पूर्वमंजूरीविना, ज्या समुद्रपार बँकेने/एजन्सीने बिल डिस्काउंट केले असेल, तिच्याकडे पूर्वी डिस्काउंट केलेल्या बिलाच्या सममूल्य रकमेचे वित्तप्रेषण करणे बँकांसाठी योग्य ठरेल.

६.१.७ <u>इइएफसी खात्यासारख्या निर्यात लाभांची उपलब्धता आणि मर्यादा पूर्ववत करणे</u>

उक्त परिच्छेद ६.१.५ मध्ये प्रतिपादित केल्याप्रमाणे, ''विदाऊट रिकोर्स'' सुविधा सर्रासपणे उपलब्ध असणार नाही. अशा प्रकारे, निर्यातदाराच्या इइएफसी खात्यात जमा वगैरेसारख्या, निर्यात लाभांची मर्यादा आणि उपलब्धता पूर्ववत करणे, ''विथ रिकोर्स'' सुविधेच्या बाबतीत, निर्यातीच्या उत्पन्नाच्या वसूलीनंतरच प्रभावी करण्यात येईल आणि बिलांच्या डिस्काउंटिंग/रिडिस्काउंटिंगच्या तारखेपासून नाही. तथापि, बिलांचे ''विदाऊट रिकोर्स'' रिडिस्काउंटींग करण्यात आले, तर मात्र रिडिस्काउंटिंग नंतर लगेच निर्यातदाराच्या निर्यात लाभाच्या मर्यादा आणि उपलब्धता पूर्ववत करणे प्रभावी करण्यात येईल.

६.१.८ <u>इसीजीसी संरक्षण</u>

'विथ रिकोर्स' रिडिस्काउंटइंग करण्यात आलेल्या बिलांच्या बाबतीत इएक्सपीर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन(इसीजीसी) ने पुरविलेल्या संरक्षणाच्या विद्यमान पध्दतीत कोणताहि बदल नाही कारण संबंधित बील समाप्त होईपर्यंत/ प्रदान होईपर्यंत निर्यातदाराचे दायित्व चालूच असते. अन्य प्रकरणात, जेथे बिले 'विदाऊट रिकोर्स' रिडिस्काउंट केली जातात, संबंधित बिलांचे रिडिस्काउंटिंग होताक्षणी इसीजीसीचे दायित्व समाप्त होते.

६.१.९ <u>पुनर्वित्तपुरवठा</u>

पीसीएफसी योजनेखालील निर्यात क्रेडिट साठी आरबीआयकडून पुनर्वित्तपुरवठ्यासाठी बँका पात्र नाहीत, त्यामुळे, विदेशी चलनात डिस्काउंटिंग/रिडिस्काउंटिंग केलेली बिले निर्यात क्रेडिट पुनर्वित्तपुरवठ्यासाठी अहवालात नमूद केलेल्या निर्यात क्रेडिट आंकड्यांपासून वेगळी दाखवावीत.

६.१.१० <u>निर्यात क्रेडिट कामगिरी</u>

(१) निर्यात क्रेडिट कामगिरीच्या हेत्वर्थ केवळ विदेशात 'विथ रिकोर्स' तत्त्वावर रिडिस्काउंटिंग केलेली आणि थकित असलेली बिलेच विचारात घेतली जातील. विदेशात 'विदाऊट रिकोर्स' रि्डिस्काउंटिंग केलेली बिले निर्यात क्रेडिट कामगिरी म्हणून धरली जाणार नाहीत.
(२) स्थानिक बाजारात 'विथ रिकोर्स' रिडिस्काउंटइंग केलेली बिले केवळ प्रथम रिडिस्काउंटिंग करणाऱ्या बँकेच्या बाबतीतच प्रतिबिंबीत होतील कारण केवळ त्याच बँकेला निर्यातदाराचा रिकोर्स उपलब्ध असेल आणि रिडिस्काउंटिंग करणारी बँक ती रक्कम निर्यात क्रेडिट मानणार नाही.

## ७. <u>निर्यात क्रेडिटवर व्याज</u>

७.१ विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट वरील व्याज दराची रचना
'विदेशी चलनातील नौप्रेषपूर्व क्रेडिट' (पीसीएफसी) आणि 'विदेशात निर्यात बिलांचे रिडिस्काउंटिंग' (इबीआर) च्या योजनांअधीन निर्यातदाराना आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक दराने निर्यात क्रेडिटच्या बाबतीत, बँकाना लिबॉर, युरो लिबॉर किंवा युरीबॉर नियम जेथे लागू असतील तेथे ते संदर्भात घेऊन खालील प्रमाणे व्याजाचे दर निश्चित करण्यास परवानगी आहे.

| | **क्रेडिटचा प्रकार** | **व्याजाचा दर (दर साल दर शेकडा)** |
|---|---|---|
| (१) | **नौप्रेषपूर्व क्रेडिट** | |
| | (अ) १८० दिवसापर्यंत | लिबॉर/युरो लिबॉर/ युरीबॉर च्या वर २ टक्केवारी बिंदु हून अधिक नाही |
| | (ब) १८० दिवसांच्या वर आणि ३६० दिवसांपर्यंत | प्रारंभिक १८० दिवसांसाठी वाढ देण्याच्या वेळी असलेल्या दराने अधिक २ टक्केवारी बिंदु म्हणजेच (१) (अ) च्यावर +२०० बेसिस पॉइंटस |
| (२) | **नौप्रेषपश्चात क्रेडिट** | |
| | (अ) मार्गस्थ कालावधीसाठी डिमांड बिलांवर (एफइडीएआयने विनिर्दिष्टीत केल्याप्रमाणे ) | लिबॉर/युरो लिबॉर/ युरीबॉर च्या वर २ टक्केवारी बिंदु हून अधिक नाही |

| | | |
|---|---|---|
| | (ब) उपयोग केलेल्या बिलांसमक्ष (निर्यात बिलांचा उपयोग केल्याचा कालावधी समाविष्ट असलेल्या एकूण कालावधीसाठी, एफइडीएआयने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मार्गस्थ कालावधी आणि जेथे लागू असेल तेथे वाढीव कालावधीसाठी क्रेडिट)<br><br>**नौप्रेषाच्या तारखेपासून** ६ महिन्यांपर्यंत | लिबॉर/युरो लिबॉर/ युरीबॉर च्या वर २ टक्केवारी बिंदु हून अधिक नाही |
| | (क) देय झाल्याच्या तारखेनंतर परंतु स्फटिकीकरणाच्या तारखेपर्यंत वसूल झालेली निर्यात बिले (डिमांड किंवा उपयोग) | देय तारखेपर्यंत उक्त (२) (ब) साठी असलेला दर अधिक २ टक्केवारी बिंदु |
| | **सूचनाः**<br>१. सेवा शुल्क, व्यवस्थापन शुल्क इत्यादी कोणत्याही नावाखाली बँकांनी अन्य कोणतेही शुल्क लावू नये; त्यामध्ये अपवाद फक्त आयबीए मार्गदर्शक तत्तवांप्रमाणे बँकांना आउट ऑफ पॉकेट खर्चाची वसुली हा असेल.<br>२. वर नमूद केलेल्या टेनर्सच्या व्यतिरिक्त अन्य प्रिशिपमेंट आणि पोस्टशिपमेंट कर्जासाठी रुपये कर्ज दर, व्याज दर निश्चित करण्यासाठी बँकाना पाया दराच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंतर्गत मोकळीक राहील. | |

**भाग -सी**

८. ग्राहक सेवा आणि कार्यपद्धतीचे सुलभीकरण

८.१ **ग्राहक सेवा**

८.१.१ सर्वसाधारण

(१) बँकानी वेळेवर आणि पुरेसे क्रेडिट पुरवावे आणि कार्यपद्धतीविषयक औपचारिकता आणि निर्यातीच्या संधिंच्या बाबतीत त्यांच्या निर्यातदार ग्राहकाना आवश्यक ती ग्राहक सेवाहि पुरवावी.
(२) बँकानी निर्यातदाराना, विशेष करून छोट्या आणि अपारंपरिक निर्यात हाती घेणाऱ्या निर्यातदाराना मार्गदर्शन करण्यासाठी निर्यात समुपदेशन कार्यालये उघडावीत.

८.१.२ निर्यात क्रेडिटच्या पुनरावलोकनासाठी कार्यकारी गट

निर्यादाराना ग्राहक सेवा पुरविण्याच्या बाबतीत विविध विषयांकडे लक्ष देण्यासाठी सध्या चालू असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, भारतीय रिझर्व बँकेने निर्यात क्रेडिटच्या पुनरावलोकनासाठी मे २००५ मध्ये निवडक बँका आणि निर्यातदार संघटनांचा समावेश असलेला एक कार्यकारी गट स्थापन केला आहे. गटाने सर्वसमावेशक शिफारशींचा एक संच सादर केला आहे ज्यापैकी बहुतेक स्वीकारण्यात आल्या आहेत आणि बँकाना कळविण्यात आल्या आहेत. (सी.एफ. पिरशिष्ट १)

८.१.३ निर्यातदारांसाठी गोल्ड कार्ड योजना

सरकारने (उद्योग आणि व्यापार मंत्रालय) आरबीआयशी समंत्रणा करून विदेशी व्यापार धोरण २००३-२००४ मध्ये असे संकेत दिले होते कि पतदार चांगला पूर्वेतिहास असणाऱ्या निर्यादाराना चांगल्या अटींवर सहजपणे निर्यात क्रेडिट उपलब्ध होण्यासाठी आरबीआयने एक गोल्ड कार्ड योजना तयार केली आहे. त्यानुसार, निवडक बँका आणि निर्यातदारांशी समंत्रणा करून गोल्ड कार्ड योजना आखण्यात आली. योजना निर्यातदारांच्या कामगिरीच्या नोंदीच्या आधारावर काही अतिरिक्त लाभ देण्याचे योजित आहे. गोल्ड कार्ड धारकाला त्याच्या चांगल्या पूर्वेतिहासाची पावती म्हणून अधिक सरळ आणि क्रेडिट पोचवणीच्या अधिक कार्यक्षम यंत्रणेचा लाभ घेता येईल. योजनेची ठळक वैशिष्ट्ये अशी आहेतः

(१) छोट्या आणि मध्यम क्षेत्रातील निर्यातदारांसह चांगला पूर्वेतिहास असणारे सर्व पतदार निर्यातदार प्रत्येक बँकेने ठरवायच्या निकषांनुसार बँकेद्वारे गोल्ड कार्डाच्या निर्गमनासाठी पात्र आहेत.
(२) योजनेखालील गोल्ड कार्ड छोट्या आणि मध्यम क्षेत्रातील निर्यातदारांसह ठरवून दिलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या पात्र निर्यातदाराना निर्गमित करण्यात येईल.
(३) ईसीजीसीद्वारे काळ्या यादीत टाकलेल्या किंवा आधीच्या वर्षाच्या उलाढालीपेक्षा १०% पेक्षा अधिक थकित बिले असलेल्या निर्यातदारांना ही योजना लागू नसेल.
(४) गोल्ड कार्ड धारक निर्यातदाराना त्यांच्या पूर्वेतिहासानुसार आणि क्रेडिटनुसार, इतर निर्यातादराना बँकांद्वारे दिल्या जात असलेल्यापेक्षा अधिक चांगल्या अटींवर, व्याज दरासहित, क्रेडिट दिले जाईल.
(५) क्रेडिटसाठी अर्जाची प्रक्रिया इतर निर्यातदारांसाठी असलेल्यापेक्षा साध्या आणि जलद प्रक्रियेधीन केली जाईल.
(६) बँकानी गोल्ड कार्ड धारकांना त्या देऊ करीत असलेले लाभ स्पष्टपणे विनिर्दिष्टीत करावेत.
(७) योजनेखाली बँका निर्यातदाराना पुरवीत असलेल्या सेवांच्या आकारांची अनुसूची आणि शुल्करचना, इतर निर्यातदाराना पुरविण्यात येणाऱ्यापेक्षा तुलनेने कमी असेल.
(८) योजनेखालील मर्यादेची मंजूरी आणि नूतनीकरण बँकानी ठरवायच्या सुलभीकृत कार्यपद्धतीच्या आधारावर असेल. निर्यातीची अपेक्षित उलाढाल आणि निर्यातदाराचा पूर्वेतिहास विचारात घेऊन बँकाना उदार दृष्टीकोन ठेवून गरजेवर आधारित वित्तपुरवठा निश्चीत करता येईल.
(९) मंजूरीच्या अटी आणि शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन स्वयंचलित नूतनीकरणाच्या तरतूदीसह ३ वर्षांच्या कालावधीसाठी ।तत्त्वतः। मर्यादा मंजूर करण्यात येईल.

(१०) अचानक आलेल्या ऑर्डर्सच्या कार्यवाहीसाठी तातडीची गरज भागविण्यासाठी निर्धारित मर्यादेच्या बाहेर २० टक्क्यांपेक्षा कमी नसलेली एक स्टँड-बाय मर्यादा अतिरिक्त मंजूर केली जाईल. मोसम ीवस्तूच्या निर्यातदारांच्या बाबतीत, पीक आणि पीक-ऑफ स्तार योग्य प्रकारे विनर्दिष्टीत करण्यात यावेत.

(११) अनपेक्षित निर्यात ऑर्डर्सच्या बाबतीत, निर्यात ऑर्डरचा आकार आणि स्वरुप लक्षात घेऊन वस्तूसूचीबाबतचे नियम शिथील करता येतील.

(१२) कार्ड धारकांचे नवीन अर्ज-मर्यादेचे आणि तदर्थ मर्यादेचे नूतनीकरण यांची प्रक्रिया बँका अनुक्रमे २५ दिवसात-१५ दिवसात आणि ७ दिवसात जलदगतिने पूर्ण करतील.

(१३) विदेशी चलनात पॅकिंग मंजूर करण्याच्या विषयात गोल्ड कार्ड धारकाना प्राधान्य दिले जाईल.

(१४) कार्ड धारकाची पत आणि पूर्वेतिहासाच्या आधारे बँका सांपार्श्विक सोडून देणे आणि इसीजीसी हमी योजनेतून सूट देण्याबाबत विचार करतील.

(१५) एटीएम, इंटरनेट बँकिंग, आंतरराष्ट्रीय डेबीट कार्डस-क्रेडिट कार्डस सारख्या पूरक सेवांमार्फत त्यांच्या कार्डाच्या अधिक मूल्यवृद्धीबाबत निर्गमित करणाऱ्या बँका निर्णय घेतील.

(१६) गोल्ड कार्ड योजनेखाली लागू होणारा व्याजचा दर संबंधित बँकेत निर्यात क्रेडिटला लागू होणाऱ्या दरापेक्षा अधिक नसेल आणि आरबीआयने विहीत केलेल्या मर्यादेच्या आत असेल. योजनेच्या उद्देशाशी प्रामाणिक राहून बँका गोल्ड कार्ड धारकाना त्याच्या श्रेणीकरणानुसार आणि पूर्वीच्या कामगिरीनुसार शक्य तेवढा उत्तम दर देण्यासाठी प्रयास करतील.

(१७) गोल्ड कार्ड धारकांच्या संदर्भात, पाठवणीनंतरच्या रुपयातील निर्यात क्रेडिटचा निर्धारित व्याज दर अधिकतम ३६५ दिवसांच्या कालावधीसाठी वाढवला जाऊ शकतो.

(१८) गोल्ड कार्ड धारकांचा, त्यांच्या वेळेवर निर्यातीच्या बिलांच्या वसूलीच्या पूर्वेतिहासाच्या आधारावर तातडीची प्रदानाची दायित्वे पूर्ण करण्यासाठी विदेशी चलनातील क्रेडिट कार्डस निर्गमित करण्यासाठी विचार केला जाईल.

(१९) गोल्ड कार्ड धारकांच्या पीसीएफसीच्या गरजा, त्यांच्या एफसीएनआर(बी) खात्यातून कर्जे मंजूर करण्याच्या बाबतीत, निर्यातदार नसलेल्या ऋणकोंच्या पुढे अग्रक्रम देऊन भागविल्या जातील याची खात्री करावी.

(२०) त्यांच्या एफसीएनआर(बी), आरएएफ वगैरे निधीतून विदेशी चलनात मुदतीचे कर्ज देण्याबाबत लायक प्रकरणात विचार करतील. (बँका अशी कर्जे त्यांच्या समुद्रपार ऋणांतून समुद्रपार ऋणांच्या २५ टक्क्याखालील खिडकीअधीन मंजूर करणार नाहीत.)

### ८.१.४ <u>विदेशी चलनात काढलेल्या निर्यात बिलांचे उत्पन्न जमा करण्यातील दिरंगाई</u>

बँकांच्या 'नोस्ट्रो' खात्यात विदेशी चलनातील रक्कम जमा झाल्यानंतर निर्यातदारांसाठी विदेशी चलनात काढलेल्या निर्यात बिलांचे क्रेडिट निर्यातदारांना देण्यात दिरंगाई आढळून आली आहे. नौप्रेषपश्चात सवलतीचा व्याज दर 'नोस्ट्रो' खात्यात जमा झाल्याच्या तारखेपासून समाप्त होईल अशा सूचना असल्या तरी, निर्यातदार उपभोगत असलेली क्रेडिटची मर्यादा ग्राहाकच्या खात्यात रुपयातील सममूल्य जमा होण्याच्या प्रत्यक्ष तारखेपर्यंत गोठविलेली असते. त्यामुळे बिलांच्या वसूलीनंतर निर्यातदारांची मर्यादा तत्परतेने परत खुली करणे आणि रुपया क्रेडिट ग्राहकाला देणे आवश्यक असते.

### ८.१.५ <u>निर्यात बिलांच्या जमा करण्यातील दिरंगाईबद्दल निर्यातदारांना भरपाईचे प्रदान</u>

(१) सर्व प्रकारे परिपूर्ण असलेल्या क्रेडिट ॲड्व्हाइसच्या बाबतीतील क्रेडिट देण्यातील दिरंगाईसंबंधात, एफईडीएआयने ठरवून दिलेली भरपाई, निर्यातदाराने मागणी करण्याची वाट न पाहता, निर्यातदार ग्राहकाला प्रदान केली पाहिजे.

(२) निर्यातदारांच्या खात्यात वेळच्यावेळी निर्यातीचे उत्पन्न जमा होण्यावर आणि एफइडीएआय नियमाप्रमाणे भरपाईच्या प्रदानाचे संनियंत्रण करण्यासाठी बँकानी एक पध्दती शोधून काढावी.

(३) बँकांच्या अंतर्गत लेखा परिक्षकानी आणि निरीक्षक संघांनी आपल्या अहवालात या पैलूंवर विशेष भाष्य करावे.

## ८.२ **<u>निर्यात क्रेडिट प्रस्तावांना मंजूरी</u>**

८.२.१ मंजूरीसाठी कालमर्यादा

नवीन/ वाढीव निर्यात क्रेडिटची मर्यादा, आवश्यक त्या पुष्ट्यर्थ आर्थिक/प्रचालनीय कागदपत्रांसह आवश्यक त्या तपशील/माहीतीसह अर्ज प्राप्त झाल्यापासून **४५ दिवसांच्या** आत मंजूर करण्यात यावी. गोल्ड कार्ड धारकांव्यतिरिक्त अन्य बाबतीत, मर्यादा वाढ आणि तदर्थ क्रेडिट सुविधेच्या मंजूरीसाठी बँकानी अनुक्रमे ३० दिवस आणि १५ दिवसांपेक्षा अधिक काळ लावता कामा नये.

८.२.२ तदर्थ मर्यादा

कधी कधी निर्यातदाराना आधी दृष्टिपथात नसलेल्या मोठ्या निर्यात आदेशांची काळजी घेण्यासाठी तदर्थ मर्यादेची गरज असते. बँकानी अशा परिस्थितीला तत्परतेने प्रतिसाद द्यावा. त्याशिवाय, ज्या विशिष्ट आदेशांसाठी उच्च क्रेडिट मर्यादा मागितलेली असते त्यासाठी आवश्यक तदनुरूप अंशदान प्रामाणिक कारणासाठी आणू न शकणाऱ्या निर्यातदारांच्या बाबतीत बँकानी लवचिक दृष्टीकोन स्वीकारावा. नौप्रेषपूर्व/नौप्रेषपश्चात निर्यात क्रेडिटच्या मार्गाने मंजूर केलेल्या तदर्थ मर्यादेवर कोणतेहि अतिरिक्त व्याज आकारायचे नाही.

निर्यात क्रेडिट मर्यादेचा पूर्ण विनियोग केल्याच्या प्रकरणात, बँकानी पतपत्रांच्या समक्ष काढलेल्या बिलांच्या वाटाघाटीत लवचिक दृष्टीकोन ठेवावा आणि अशा प्रकरणात निर्यात्‌दारांच्या क्रेडिटच्या गरजा भागविण्यासाठी शाखा व्यवस्थापकाना निर्णायक/उच्च मंजूरीचे अधिकार देण्याबाबत विचार करावा. अशाच प्रकारे निर्यातदाराना तातडीच्या आदेशांची पूर्तता करता यावी या दृष्टीकोनातून ज्यानी मूळ मंजूरी दिली आहे त्या उच्च अधिकाऱ्यानी/बोर्डाने/समितीने त्यांचीमंजूरी प्रलंबित असेपर्यंत वाढीव/तदर्थ मर्यादेची काही टक्केवारीचे वाटप करण्यासाठी बँकाना अधिकार देता येतील.

८.२.३ इतर आवश्यकता

(१) निर्यात क्रेडिटचे फेटाळण्यात आलेले सर्व प्रस्ताव फेटाळण्याचे कारण स्पष्ट करून बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या नजरेला आणावेत.
(२) बँकेच्या लेखा परिक्षक आणि निरीक्षक संघाने आरबीआयने विहित केलेल्या वेळेच्या अनुसूचीच्या मर्यादेत निर्यात क्रेडिट वेळेवर मंजूर करण्यावर विशिष्ट भाष्य करावे.
(३) खेळत्या भांडवलाच्या कर्ज आणि रोख क्रेडिट घटकांत विभागणी करण्यातून निर्यात क्रेडिट मर्यादा वगळण्यात यावी.
(४) निर्यातदारांशी संबंधित प्रकरणे तत्पर आणि वेळेवर निकालात काढण्याची खात्री करण्यासाठी बँकानी त्यांच्या विदेश विभागात/विशेष शाखात पूर्तता अधिकारी म्हणून योग्य अधिकारी नामनिर्देशित करावा.
(५) निर्यातदारांना क्रेडिट मर्यादा मंजूर केल्याच्या स्थितीबाबत बोर्डाला त्रैमासिक अंतराने पुनरावलोकन टीप सादर करणे आवश्यक आहे. या टीपेत इतर बाबींबरोबरच, विहीत कालावधीच्या चौकटीत मंजूर केलेल्या अर्जांची संख्या(क्रेडिटच्या राशीसह), उशिराने मंजूर केलेल्या प्करणांची संख्या आणि प्रलंबित मंजूरी त्यासाठी कारणासह यांचाहि समावेश असावा.

## ८.३ **विदेशी चलनातील आणि रुपयातील निर्यात क्रेडिटच्या पोचवणीसाठी कार्यपध्दतीचे सुलभीकरण**

**८.३.१ सामान्य**

निर्यातदारांना वेळेनुसार पत पुरवठा होण्याची खात्री करण्यासाठी आणि प्रक्रियेतील अडथळे काढण्यासाठी, रुपये निर्यात क्रेडिटसाठी आणि परकीय चलनातील निर्यात क्रेडिट लागू असलेल्या पुढील मार्गदर्शक सूचना अंमलात आणल्या जाऊ शकतात.

८.३.२ **मार्गदर्शक तत्त्वे**

(१) कार्यपध्दतीचे सुलभीकरण

(अ) बँकांनी निर्यातदारांना त्यांच्या क्रेडिट मर्यादेचे निर्धारण करण्यासाठी सादर करावी लागणारी माहिती कमी करावी आणि अर्जाचा नमुना सोपा करावा, जेणेकरून निर्यातदारांना अर्ज भरण्यासाठी किंवा बँकाना आवश्यक असलेली माहिती पुरविण्यासाठी बाहेरची व्यावसायिक मदत घेण्याची गरज भासणार नाही.
(ब) बँकानी त्यांच्या निर्यातदार ग्राहकांच्या खेळत्या भांडवलाच्या गरजेचे निर्धारण करण्यासाठी, अपेक्षित ताळेबंद पत्रक पध्दती, ऊलाढाल पद्धती किंवा रोख अंदाजपत्रक पध्दती, यापैकी त्यांच्या व्यावसायिक प्रचालनाला सर्वात योग्य आणि सोयीस्कर असेल ती कोणतीहि पध्दत स्वीकारावी.
(क) सांघिक वित्तपुरवठ्याच्या बाबतीत, एकदा संघाने निर्धारण मान्य केले कि, सदस्य बँकानी एकाच वेळी त्यांची संबंधित मंजूरीची प्रक्रिया सुरू करावी.

(२) <u>निर्यातदाराना 'ऑन लाईन' क्रेडिट</u>

(अ) बँकानी साधारणपणे एक वर्षासाठी 'लाईन ऑफ क्रेडिट' द्यावी जिचे वार्षिक पुनरावलोकन केले जाईल. नूतनीकरणातील दिरंगाईच्या प्रकरणात, मंजूर केलेली मर्यादा अबाधितपणे अनुज्ञेय असावी आणि निर्यातदाराच्या तातडीच्या गरजा तदर्थ तत्त्वावर पूर्ण करण्यात याव्यात.
(ब) समाधानकारक पूर्व इतिहास असणाऱ्या प्रस्थापित निर्यातदारांच्या बाबतीत, बँकानी निर्धारित एकूण बाह्य मर्यादा राशीच्या वाढविण्याच्या/कमी करण्याच्या अंगभूत लवचिकतेसह अधिक दीर्घ कालावधीसाठी, समजा ३ वर्षांसाठी, 'लाईन ऑफ क्रेडिट' मंजूर करण्याचा विचार करावा. वाढविण्याच्या मर्यादा निर्यातदाराने कामगिरीचे पूर्व-निश्चीत मापदंड पूर्ण केल्यानंतर प्रचलित होतील. बँकानी अशा दीर्घ कालावधीसाठी निर्यातदारांना मंजूर केलेली बाह्य मर्यादा सामावून घेणारी सुरक्षा कागदपत्रे प्राप्त करावीत.
(क) मोसमी वस्तू, शेती-आधारित उत्पादने वगैरेंच्या निर्यातीबाबत, बँकानी निर्यातदाराना घाईगर्दीच्या/घाईगर्दी नसलेल्या क्रेडिट सुविधा पुरवाव्यात.
(ड) बँकांनी नौप्रेष(शिपमेंट) पूर्व आणि नौप्रेष(शिपमेंट) पश्चात क्रेडिट मर्यादांच्या आंतर-परिवर्तनीयतेला परवानगी द्यावी.
(इ) क्षमतेची वाढ, यंत्रसामग्रीचे आधुनिकीकरण आणि तंत्रशास्त्र अद्यतन करण्यासाठी मुदत कर्जांच्या गरजा सुध्दा बँकानी त्यांच्या सामान्य व्याज दराने पूर्ण कराव्यात.
(फ) निर्यात क्रेडिटचे निर्धारण 'गरज-आधारित' असावे आणि सांपार्श्विक सुरक्षेच्या उपलब्धतेशी थेट निगडित नसावे. निर्यातदाराच्या पूर्व इतिहासाच्या आणि कामगिरीच्या आधारावर जोपर्यंत क्रेडिट मर्यादा न्यायोचित आहे, केवळ सांपार्श्विक सुरक्षा उपलब्ध नसल्याच्या कारणाने क्रेडिट नाकारू नये.

(३) <u>नौप्रेष (शिपमेंट)पूर्व क्रेडिट मिळविण्यासाठी पतपत्रे/निर्यात ऑर्डर सादर करण्याचे सोडून देणे</u>

(अ) सातत्याने चांगला पूर्व इतिहास असणाऱ्या निर्यातदाराकडून, बँकानी प्रत्येक वाटपाच्या वेळी निर्यात ऑर्डर किंवा पतपत्रे सादर करण्यासाठी आग्रह धरू नये. त्याऐवजी, हाती असलेल्या निर्यात ऑर्डरचे किंवा पतपत्रांचे नियतकालीन विवरणपत्र सादर करण्याची पध्दत चालू करावी.
(ब) बँका, प्रारंभापासूनच, चांगला पूर्व इतिहास असणाऱ्या निर्यातदारांच्या बाबतीत आदेश/एलसीज सादर करणे सोडून देऊ शकतात आणि हाती असलेल्या शेष आदेशांचे/एलसीजचे नियतकालीन विवरणपत्र सादर करण्याची पध्दत अवलंबू शकतात. ही बाब मंजूर प्रस्तावात त्याचप्रमाणे निर्यातदारांना देण्यात येणाऱ्या मंजूरी पत्रात अंतर्भूत करता येईल आणि योग्य प्रकारे इसीजीसीच्या नजरेला आणून देता येईल. त्याशिवाय, असे सोडून देणे नंतरच्या क्रेडिट मर्यादेच्या मंजूरीच्या वेळेस उचित अधिकाऱ्यांच्या अनुमतिने अनुज्ञेय केले असेल, तर ते दुरुस्तीद्वारे मंजूरीच्या अटीत अंतर्भूत करावे आणि इसीजीसीला कळवावे.

(४) <u>निर्यात कागदपत्रे हाताळणे</u>

बँकानी, इतर बाबींबरोबर, विनिमय नियंत्रण नियमांनुसार मूळ विक्री कंत्राट/निश्चीत ऑर्डर/समुद्रपार खरेदीदाराने प्रतिसाक्षांकित केलेले प्रपत्र बीजक/समुद्रपार खरेदीदाराच्या अधिकृत एजन्ट्कडील इंडेंट, निर्यात कागदपत्रे हाताळण्यासाठी प्राप्त करणे आवश्यक आहे. पतपत्राद्वारे (एल/सी) व्यवहारात जेथे पतपत्राच्या अटीनुसार विक्रीचे कंत्राट/अन्य पर्यायी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे त्या प्रकरणांव्यतिरिक्त अशी कागदपत्रे सादर करण्यासाठी निर्यात कागदपत्रे हाताळण्याच्या वेळी आग्रह धरणे आवश्यक नाही कारण कस्टम्स अधिकाऱ्यानी आधीच मालाचे मूल्यांकन करून तो मुक्त केला आहे.

(५) <u>निर्यात क्रेडिटचा शीघ्रगतीने निपटारा</u>

(अ) मोठ्या प्रमाणावर निर्यात व्यवसाय असणाऱ्या विशेष शाखा आणि शाखांमध्ये, निर्यातदार-ग्राहकांच्या सहाय्यासाठी सुविधा पुरविणारी एखादी यंत्रणा, क्रेडिट अर्जांच्या शीघ्र प्रारंभिक छाननीसाठी आणि अतिरिक्त माहिती मिळविणारी चर्चा करण्यासाठी किंवा स्पष्टीकरणांसाठी सुरू करावी.
(ब) बँकानी आपली अंतर्गत यंत्रणा आणि कार्यपध्दती निर्यात क्रेडिट प्रस्ताव निर्धारित कालमर्यादेत निकालात काढण्यासाठी सुसूत्रित करावी आणि निर्यात क्रेडिट प्रस्ताव विहित कालावधीपूर्वी निकालात काढण्यासाठी प्रयास करावेत. क्रेडिट प्रस्तावांबरोबर, प्राप्तीच्या तारखेपासून मंजूरीच्या तारखेपर्यंत क्रेडिट अर्जाची कालक्रमानुसार मार्गक्रमणा दर्शविणारा आलेख असावा.
(क) बँकानी आपल्या शाखाना निर्यात क्रेडिटसाठी मंजूरीचे उच्चाधिकार द्यावेत.
(ड) बँकानी मंजूरीच्या प्रक्रियेतील किमान काही पातळ्या कमी करण्याबाबत विचार करावा. निर्यात वित्तपुरवठ्याच्या बाबतीतील निर्णय घेण्यात समाविष्ट असलेल्या पातळ्या तीनपेक्षा अधिक नसणे हे इष्ट असेल.
(इ) निर्यात क्रेडिट प्रस्तावांची प्रक्रिया जलद पूर्ण करणे सुविधाजनक होण्यासाठी, बँकानी शाखा आणि प्रशासकीय कार्यालयात, अधिकाऱ्यांकडून 'संयुक्त मूल्यन' करण्याची पध्दत सुरू करावी.
(फ) जेथे शक्य असेल तेथे, बँकानी निर्यातदाराना खेळते भांडवल मंजूर करण्यासाठी, विशेष शाखा आणि प्रशासकीय कार्यालयात एक 'क्रेडिट समिती' स्थापन करावी. क्रेडिट समितीला मंजूरीसाठी पुरेसे उच्चाधिकार असावेत.

(६) <u>प्रसिध्दी आणि प्रशिक्षण</u>

(अ) सर्वसाधारणपणे, बँकांच्या निवडक शाखांमध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक दराने विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट उपलब्ध केले जाते. योजना अधिक लोकप्रिय करण्याच्या दृष्टीने आणि विदेशी चलनातील कर्जांवरील स्पर्धात्मक व्याज दरांचा विचार करून आणि कोणतीहि संभाव्य विनिमयातील जोखीम कमी करण्यासाठी, निर्यातदाराना विदेशी चलनातील निर्यात क्रेडिटचा जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे निर्यातदारांची मोठ्या प्रमाणावर संख्या असलेल्या भागात असलेल्या बँकानी, या महत्त्वाच्या सोयीला खूप प्रसिध्दी दिली पाहिजे आणि लघु निर्यातदारांसह सर्व निर्यातदारांना ते सहजगत्या उपलब्ध करून द्यावे आणि विदेशी चलनातील निर्यात क्रेडिट उपलब्ध करून देण्यासाठी अधिक शाखा नामाभिधानित केल्या जातील याची खात्री करावी.
(ब) प्रतिष्ठित निर्यातदारांना निर्धारित व्याज दराची व्यापक प्रकारे उपलब्ध असलेल्या सुविधोच्या प्रसिद्धीची व्यवस्था आणि ह्या संदर्भात कार्यरत कर्मचा-यांचे योग्य प्रशिक्षण झाले असल्याची खात्री बँका करू शकतील.
(क) प्रचालनीय स्तरावरील अधिकाऱ्याना पुरेसे प्रशिक्षण देण्यात यावे. निर्यात क्रेडिटमध्ये व्यवहार करणाऱ्या महत्त्वाच्या शाखांतील अधिकाऱ्यांच्या बदलीच्या विषयात, बँकानी काळजी घ्यावी कि, निर्यात क्रेडिट मर्यादेच्या प्रक्रियेत/मंजूरीत दिरंगाई टाळण्यासाठी, आणि त्यामुळे संबंधित निर्यातदाराला निर्यात आदेश रद्द करण्याची वेळ न येऊ देण्यासाठी नेमलेल्या नवीन व्यक्तिकडे विदेशी चलन तसेच निर्यात क्रेडिटच्या विषयात पुरेसे ज्ञान असेल.

(७) <u>ग्राहक शिक्षण</u>

(अ) त्याच्या निर्यातदार-ग्राहकांच्या फायद्यासाठी बँकानी आतंरराष्ट्रीय स्पर्धात्मक दराने विदेशी चलनातील तसेच रुपयातील निर्यात क्रेडिटच्या मंजूरीसाठी कार्यपध्दतीच्या सुलभीकरणाची ठळक वैशिष्ट्ये असणारी पुस्तिका काढावी.
